YouTube Live
f LIVE
सह्याद्री न्यूज चॅनलच्या थेट प्रक्षेपण (LIVE) कार्यक्रमास हजारो प्रेक्षकांनी प्रतिसाद दिला त्याबद्दल आभार !!
कार्यक्रमाच्या थेट प्रक्षेपण (LIVE) साठी संपर्क
9011708840, 9673560360

RNI. MAHMAR/2018/77866

मराठी साप्ताहिक

# सह्याद्रीचा राखणदार

www.sahyandrinews.com     संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे

वर्ष ५ वे     अंक २०     सोमवार, दि. ९ मे २०२२     पृष्ठ ४     मुल्य २/- रूपये

## मृदा व जलसंधारण कार्यालय 'सील'

### ५० लाखांचे लाच प्रकरण, आणखी मासे गळाला लागण्याची शक्यता



**चंद्रपूर / प्रतिनिधी**
५० लाखांची लाच घेतल्या प्रकरणी मृदा व जलसंधारण विभागातील ३ मोठ्या अधिकाऱ्यांना रंगेहाथ अटक करण्यात आली होती. या तपासात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने चंद्रपुरातील मृदा व जलसंधारण कार्यालयाला सील ठोकले आहे. यापूर्वी असे आणखी काही प्रकरणे झाली आहेत का, तसेच सध्याच्या तपासात काही ठोस पुरावे हाती लागतात का या दिशेने कसून चौकशी केली जात आहे. त्यामुळे येणाऱ्या काही दिवसांत आणखी काही लोकांना अटक होण्याची शक्यता बळावली आहे.

लाच लुचपत प्रतिबंधक पोलीस विभागाने ५० लाखांची लाच घेतल्या प्रकरणी ३ मे च्या रात्री मृद व जलसंधारण अधिकारी कविजित पाटील (नागपूर), श्रावण शेंडे (ब्रम्हपुरी) व रोहित गौतम (चंद्रपूर) यांना अटक केली. लाच लुचपत प्रतिबंधक विभाग नागपूरने अटक केल्यानंतर न्यायालयाने त्या लाचखोर अधिकाऱ्यांची ४ मे ला ६ दिवसांसाठी पोलीस कोठडीत रवानगी केली.

दरम्यान या गुन्ह्याचा सूक्ष्म तपास उपविभागीय पोलीस अधिकारी अनामिका मिर्झापुरे आणि टीम करीत असून शुक्रवार ६ मे ला सायंकाळच्या सुमारास मृद व जलसंधारण विभागाच्या कार्यालयाला सील ठोकण्यात आल्याने जलसंधारण विभागात खळबळ उडाली आहे.

#### लेखापालच्या घरी आढळले ४ लाख ९० हजार

एसीबीच्या ३ पथकाच्या या संयुक्त कारवाईची चर्चा असतांना या तिन्ही अधिकाऱ्यांनी ८१ लाखांची मागणी कशी केली, कुणासाठी केली याचा शोध आता सुरू झाला आहे. गुरुवारी या अधिकाऱ्यांच्या घरांची झडती घेतली असता रोहित गौतम ४ लाख ९० हजार रोख सापडली होती. तपासाचा भाग म्हणून जलसंधारण विभागाचे चंद्रपूर येथील कार्यालय सील केले असले तरी तपास चंद्रपुर, ब्रम्हपुरी व नागपूर भोवती फिरत आहे. लाचेची रकम लक्षात ठेवून हा तपास सुरू आहे.

#### एकाच वेळी तीन ठिकाणी कारवाई करण्याचे गूढ कायम

**या तीन अधिकाऱ्यांना पकडण्यासाठी एकाच वेळी नागपूर, ब्रम्हपुरी आणि चंद्रपूर या ठिकाणी कारवाई करण्यात आली. मात्र ही कारवाई नेमकी कशी करण्यात आली याचे गूढ अद्याप कायम आहे. यासंदर्भात विभागाचे अधिकारी देखील स्पष्टपणे सांगण्यास कचरत आहेत.**

#### अशी होती टक्केवारी

कार्यकारी अभियंता कविजित पाटील यांनी टक्केवारी नुसार १९ लाख २२ हजार ५३६ रुपये, उपविभागीय जलसंधारण अधिकारी चंद्रपुर श्रावण शेंडेंनी ५६ लाख रुपये तर विभागीय लेखाधिकारी रोहित गौतम यांनी ५.५० लाख रु मागितले होते. इतकी मोठी रकम हे अधिकारी स्वतः ठेवणार होते की त्याची वाटणी होणार होती ? कुणा कुणाला यातील हिस्सा जात होता ? याचा शोध घेण्यासाठी सद्या नागपूर, चंद्रपूर व ब्रम्हपुरी येथील जलसंधारण च्या कार्यालयातून कागदपत्रे गोळा केली जात आहे अशी माहिती सूत्राने दिली आहे. पोलीस अधीक्षक राकेश ओला यांच्या मार्गदर्शनात पोलीस उपअधीक्षक अनामिका मिर्झापुरे, पोलीस निरीक्षक सचिन मत्ते, सारंग निराशे, प्रवीण लाकडे यांची तपास मोहीम सुरू आहे.

## रेती तस्करीत वरोरा तालुक्याचे नाव रोशन

### रुजू होताच एसडीपीओचे सुरु झाले मिशन



#### उपविभागीय अधिकारी यांनी दिले होते मार्च महिन्यातच आदेश .

वरोरा आणि भद्रावती तालुक्यातील सर्व रेती घाटांवर लक्ष केंद्रित करण्याकरिता आणि रेती चोरी थांबिण्याकरिता पथक तयार करून कारवाईचे निर्देश उपविभागीय अधिकारी सुभाष शिंदे यांनी मार्च महिन्यात तहसीलदारांना पत्राद्वारे दिले होते . परंतु याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याने अनेक रेती घाटामधून कोट्यवधींचा रेतीसाठा चोरीला गेला आहे या प्रकरणाची आपण दखल घेतली असून चौकशी करून दोषी अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाई करू अशी प्रतिक्रिया उपविभागीय अधिकारी सुभाष शिंदे यांनी दिली .

**वरोरा / प्रतिनिधी**
तालुक्यातील रेती घाटावर रेती तस्करांनी आपले अधिराज्य गाजवत एसडीपीओ आयुष नोपानी प्रशिक्षणासाठी काही दिवस बाहेर गेले असल्याचा फायदा घेत महसूल विभागाला कोट्यवधीचा चुना लावत रेती तस्करी मध्ये तालुक्याचे नाव रोशन केले होते.मात्र एसडीपीओ रुजू होताच रेती तस्कर तसेच अवैध व्यावसायिकांच्या मुसक्या आवळण्याचे मिशन सुरु केले आहे. तालुक्यातील सोईट रेती घाटावर रात्रीच्या सुमारास धाडसत्र राबवून कोट्यवधी रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. एसडीपीओच्या या ॲक्शन मोड कारवाईने अवैध व्यावसायिकांचे चांगलेच धाबे दणाणले आहे .

तालुक्यातील सोईट येथील वर्धा नदीच्या पात्रातील रेती घाटाचा शासनाने लिलाव केला. लिलावातअधिकृत व्यक्तीने रेती घाट घेतला.रीतसर परवाना घेऊन रेती घाट व वाहतूक सुरू होती. घाटात कोणतीही यंत्रसामग्री वापरता येत नाही. तसेच ट्रॅक्टर वगळता कोणतेही मोठे वाहन नेता येत नाही.रेती ट्रॅकटरमध्ये मजुरांकडून भरावीव सूर्यास्तापर्यंतच काम करावे, असानियम आहे. असे असतानाही रात्रीमशीनद्वारे रेतीचे उत्खनन करूनत्याद्वारे रेती भरली जात होती. याठिकाणी उपविभागीय पोलीस अधिकारी आयुष्य नोपानी यांनी धाड टाकली. यामध्ये सहा हायवा ट्रक, दोन टिप्पर, दोन पोकलेन मशीन, १८ ब्रास रेती असा दोन करोड ८० लाख रुपयांचा ऐवज जप्त करीत १७ व्यक्तींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे .

## स्टुडंट फोरम ग्रुप कोरपना तर्फे शैक्षणिक, सांस्कृतिक क्रीडा महोत्सवाचे आयोजन



**कोरपना / प्रतिनिधी**
स्टुडंट फोरम ग्रुप कोरपना द्वारा आयोजित शैक्षणिक, सांस्कृतिक क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन दि. ८ मे रोजी ॲड. मोरेश्वर टेमुर्डे माजी विधानसभा उपाध्यक्ष महाराष्ट्र राज्य यांच्या हस्ते करण्यात आले. सकाळी ९:३० वाजता महात्मा ज्योतिबा फुले शिष्यवृत्ती स्पर्धा घेण्यात आली. त्यात दोन परीक्षा केंद्रावर ४३७ विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती स्पर्धेत भाग नोंदविला. सायंकाळी ७:०० वाजता स्वयं रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. स्वयं रोजगार मेळाव्यात १२ गावच्या महिला बचत गटांनी सहभाग घेतला होता. त्यात पापड, लोणचे, अगरबत्ती, चाय पत्ती, झुणका-भाकर, स्वहस्तलिखित पेंटिंग, पाणीपुरी, अनेक प्रकारच्या खाद्यपदार्थ आणि प्रोडक्स प्रदर्शनी सुरू करण्यात आली. हा कार्यक्रम सतत तीन दिवस म्हणजे ८ मे ते १० मे पर्यंत चालणार आहे.

तसेच रात्री ८:०० वाजता भव्य नृत्य स्पर्धेचे उद्घाटन राजेंद्र वैद्य यांच्या हस्ते करण्यात आले. भव्य नृत्य स्पर्धेत ५० सहभागी स्पर्धकांनी सहभाग घेतला. त्यातील २० स्पर्धकांनी उत्कृष्ट प्रदर्शन करून रसिक वर्गांना आपल्या कलेतून मोहीत केले. रसिक वर्गांनी कार्यक्रमाचा मनसोक्त आस्वाद घेऊन जवळपास २ हजार रसिकांनी कार्यक्रमाला हजेरी लावली. तसेच मान्यवरांच्या हस्ते स्टुडंट फोरम ग्रुपच्या कार्यातून सहभाग घेऊन मोठ्या हुद्द्यावर नोकरीवर लागलेल्या सदस्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच सेवानिवृत्त शासकीय कर्मचारी यांचाही सत्कार करण्यात आला.

या महोत्सवाचे मुख्य आकर्षण म्हणजे दोनदा राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त आदर्श सरपंच भास्करराव पेरे पाटील यांचा जाहीर व्याख्यानाचा कार्यक्रम दि. १० मे रोज मंगळवारला सायंकाळी ६:०० वाजता आयोजित केला आहे. तरी परिसरातील ग्रामस्थांनी कार्यक्रमाला येऊन आपल्या गावातील विकासाला चालना देण्याच्या उद्देशाने कार्यक्रमाला हजेरी लावून सहभाग नोंदवावा. जाहीर व्याख्यानातून 'सरपंचाने गावाच्या विकासासाठी आईची भूमिका वटवावी व युवकांनी गावा पुढील आव्हाने स्वीकारावे' हा विषय घेऊन भास्करराव पेरे पाटील येत आहे. हा विषय निवडण्यामागचा उद्देश म्हणजे जोपर्यंत आपण आपल्या आईच्या ममत्वेचा आदर करतो. आपल्या आईची अब्रु चारचौघात वेशीवर येऊ देत नाही. त्याचप्रमाणे आपल्या गावाचा विकास करताना महिलांच्या समस्यांचा सामना करताना आपण डोळेझाक करत असतो. म्हणून गावाच्या विकासात कागदोपत्री विकास करून चालणार नाही, तो सत्यात उतरविला पाहिजे. या उद्देशाने व्याख्यानात या विषयाची मांडणी केली आहे. तरी जास्तीत जास्त संख्येने या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## पीक कर्जाची नियमित कर्ज परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर अनुदान थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यात

### सहकारी संस्थेच्या विभागीय सहनिबंधकांना राज्य शासनाच्या सूचना, तातडीने मागितली माहिती



"जिल्ह्यातील संबधीत गट सचिव, सहकारी संस्था आदींनी ताबडतोब शासनाने दिलेल्या नमुण्यानुसार नियमित पीक कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांची माहिती पाठवावी. व सहकार्य करावे, असे आवाहन रवि शिंदे यांनी केले आहे.

**भद्रावती / प्रतिनिधी**
महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागातर्फे सन २०२० च्या पहिल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना जाहिर केली असून सदर योजनेची अंमजबजावणी अद्याप सुरु आहे. त्याचप्रमाणे पीक कर्जाची नियमित कर्ज परतफेड करणा-या शेतक-यांना प्रोत्साहनपर अनुदान देण्याची घोषणा राज्य सरकारने केली होती. सदर प्रोत्साहनपर अनुदान थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यामध्ये जमा करण्याची कार्यवाही संगणकीय प्रणालीद्वारा करावयाची असून त्यासाठी आवश्यक पूर्वतयारी तातडीने सुरु करण्याबाबतचे निर्देश राज्य शासनाने ६ मे २०२२ ला एका पत्रांनवये राज्यातील सर्व सहकारी संस्थेच्या विभागीय सहनिबंधकांना दिलेल्या आहेत.

चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे माजी अध्यक्ष तथा विद्यमान संचालक रवि शिंदे यांनी याकरीता राज्य शासनाकडे पत्रव्यवहार करून पाठपुरावा केलेला होता, सोबतच पिककर्जाची विहित मुदतीत नियमित परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना कर्जमाफी देन्याबाबात मागणी केलेली होती. त्याच दरम्यान महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना २०१९ अंतर्गत पीक कर्जाची नियमित परतफेड करणा-या शेतक-यांना प्रोत्साहनात्मक अनुदान देण्यात येईल, अशी घोषणा ६ मार्च २०२२ ला राज्य शासनाने केलेली होती.

याअन्वये दिलेल्या नमून्यानुसार अधिनस्त जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका तथा विविध कार्यकारी सहकारी संस्था यांचेकडून आठ दिवसांत माहिती प्राप्त करण्यास सांगितले आहे.

तसेच या पत्रांनवये दिलेल्या सूचनेनुसार सन २०१७-१८, २०१८-१९व२०१९-२०या कालावधीत वितरित पीक कर्जाचा समावेश असणे आवश्यक आहे. ज्या शेतकऱ्यांनी या तीन पैकी एक किंवा दोन वर्षामध्ये पीक कर्जाची उचल करून त्या कर्जाची विहीत मुदतीत परतफेड केली असेल अशा शेतकऱ्यांच्या माहितीचा ज्या-त्या वर्षामध्ये समावेश असणे आवश्यक आहे. संबंधित कालावधीत शेतकऱ्यांनी उचल केलेल्या पीक कर्जाची संपूर्ण परतफेड बँकेने विहीत केलेल्या मुदतीत करणाऱ्या शेतकऱ्यांची माहिती समाविष्ट करावी, थकीत राहिलेल्या विहीत मुदतीनंतर परतफेड केलेल्या त्याचप्रमाणे अंशतः कर्ज परतफेड केलेल्या शेतकऱ्यांच्या माहितीचा समावेश करु नये. आदी सूचना करण्यात आलेल्या आहे.

## ईद मिलन सारख्या कार्यक्रमाने समाजात बंधुभाव वाढतो - खा.धानोरकर



**चंद्रपूर / प्रतिनिधी**
ईद मिलन'सारख्या कार्यक्रमाने समाजात बंधुभाव, सहकार्य आणि विश्वास वाढीस लागतो. यामुळे अशा प्रकारचे सामाजिक कार्य कौतुकास्पद असल्याचे प्रतिपादन खासदार बाळु धानोरकर यांनी केले . मुस्लिम समाज संघर्ष समिती वरोरा तर्फे आयोजित ईद मिलन कार्यक्रमात केले .

या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून खासदार बाळु धानोरकर, प्रमुख पाहुणे व सत्कार मूर्ती म्हणून आमदार प्रतिभा धानोरकर,. उपविभागीय पोलीस अधिकारी आयुष नोपानी , माजी नगराध्यक्ष अहेतेशाम अली , माजी नगरसेवक छोटुभाई शेख , एम आय एम राज्य प्रवक्ता प्रा. जावेद पाशा , विलास नेरकर, भाजपा नेते बाबा भागडे, सामजिक कार्यकर्ते रमेश राजूरकर , काँग्रेसचे शहराध्यक्ष विलास टिपले , शिवसेना जिल्हा प्रमुख मुकेश जिवतोडे, विशेष अतिथी म्हणून उपविभागीय अधिकारी सुभाष शिंदे , तहसीलदार रोशन मकवाने , मुख्याधिकारी गजानन भोयर , पोलीस निरीक्षक दीपक खोब्रागडे उपस्थित होते .

या कार्यक्रमाला सर्व धर्मांच्या नागरिकांची उपस्थिती होती . सर्वांनी एकमेकांना ईद च्या शूभेच्छा दिल्या . तसेच यावेळी उपस्थीत मान्यवरांच्या हस्ते उपविभागीय पोलिस अधिकारी आयुष नोपानी व आमदार प्रतिभा धानोरकर यांचा शाल व पुष्पगुच्छ देवून सत्कार करण्यात आला . यावेळी सर्व मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले . सर्व मान्यवरांनी समाजात बंधुभाव, एकात्मता , शांतता राखण्याचे आवाहन केले .

## लोकहितार्थ अन्यायाला वाचा फोडणे ही पत्रकाराची भूमिका : आ.जोरगेवार



**चंद्रपूर / प्रतिनिधी**
पत्रकार हा लोकहितासाठी अन्यायाला वाचा फोडण्याचे काम करतो. पत्रकार हा समाजाचा आरसा आहे. पत्रकार शासन, प्रशासन आणि समाज यांच्यातील दुवा म्हणून काम करतो. पत्रकारांनी समाजाचे प्रतिबिंब म्हणून काम केल्यास खऱ्या अर्थाने समाजाला न्याय मिळेल व समाजातील तळागळातील लोकांचा विकास होईल असे प्रतिपादन आ. किशोर जोरगेवार यांनी केले.

महाराष्ट्र साप्ताहिक ग्रामीण पत्रकार परिषदेच्या वतीने आयोजित दि. ३ मे रोजी जागतिक पत्रकार स्वातंत्रता दिवस या कार्यक्रमाचे आयोजन जिल्हा परिषद चंद्रपूर येथील मा. सा. कन्नमवार सभागृहात करण्यात आले होते. सदर कार्यक्रमाचे उद्घाटन आ. किशोर जोरगेवार यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या सुरूवातीला आचार्य बाळशास्त्री जांभेकर व बसेश्वर महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून व दिपप्रज्वलन करून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून गोपाल मुंदडा संस्थापक योग नृत्य परिवार, ज्येष्ठ पत्रकार किशोर पोतनवार, साहित्यिक लेखक डॉ. इसादास भडके, संपादक डि. के. आरीकर, संपादक चंद्रगुप्त रायपुरे उपस्थित होते. या कार्यक्रमात प्रामुख्याने समाजातील विविध क्षेत्रात काम करणाऱ्या जसे प्रशिक्षक, रोटी बँक, पक्षीमित्र, रक्तदान सेवार्थ काम करणारे लोक, समाजसेवा करणारे लोक, विशिष्ट सामाजिक जबाबदारी जोपासणारे व्यक्ती यांच्या प्रामुख्याने सत्कार करण्यात आला. त्याप्रसंगी शशिकांत मोकाशे यांचा उत्कृष्ट प्रशिक्षक उपजीविका अभियान, औद्योगिक सुरक्षा, अग्निसुरक्षा प्रशिक्षक, उद्योजकीय मार्गदर्शक, उत्कृष्ट विषयावर कार्यक्रम आयोजक म्हणून शासकीय निमशासकीय व संस्था स्तरावर निरंतर काम करतात याकरिता त्यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे आयोजन पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष गोविंद मित्रा यांना त्यांच्या सामाजिक भूमिकेत कर्मठ कर्तृत्वाबाबत पुरस्कृत करण्यात आला. सदर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी गोपी मित्रा, शशिकांत मोकाशे, सारिका उराडे, शशी ठक्कर, कुमारी टीना उराडे, चंद्रशेखर देशमुख ,बंडू कामतवार, आशिष घुमे इत्यादींनी त्यांची चमू यांनी अथक परिश्रम घेउन कार्यक्रम सुरेख रित्या पार पडला.

## वरुर येथील सोशल युथ क्लबवर धाड

### ८५ व्यक्तीवर कारवाई

- यातील मिळालेला मुद्देमाल १० लाख ७१ हजार ६९२ रोख रक्कम, मराझो कार अंदाजे किंमत ६ लाख रुपये, क्लासिकल पत्ते ५५५, मार्क केक नोट सोलुशन मशीन किंमत ७ हजार रुपये, डेल कंपनी चे मॉनिटर ५ हजार रुपये, सी.पी प्लस डीव्हीआर किंमत ५ हजार रुपये असा एकूण १६ लाख ८८ हजार ६९२ रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.
- ८५ जुगाऱ्यावर ४, ५ महाराष्ट्र जुगार कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल केला असून यातील आरोपी युथ सोशल क्लब अध्यक्ष वेंकटेश मल्लय्या तोटा वय ३६, रा. तेलंगणा राज्यातील मंचिर्याल यांचेवर कलम ३५३, ३३२ शासकीय कामात अडथळा निर्माण करणे, व शासकीय कर्मचाऱ्यांना मारहाण करणे या नुसार गुन्हा दाखल करून अटक करण्यात आली.

**राजुरा / प्रतिनिधी**
दि. ७ मे रात्री ११:३० वाजताच्या सुमारास वरुर रोड येथील सोशल युथ क्लब येथे जिल्हा अप्पर पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी आपल्या कर्मचाऱ्यांसह धाड टाकून ८५ जुगार खेळणाऱ्यावर व युथ सोशल क्लब अध्यक्षावर व इतर दोन जनावर गुन्हा दाखल केला.

राजुरा तालुक्यातील राज्य महामार्गा लगत येत असलेल्या विरूर पोलीस स्टेशनच्या हद्दीमधील वरुर रोड येथे सोशल युथ क्लब हा मागील दहा ते बारा दिवसापासून चालू होता. शासकीय नियमानुसार रात्री दहा वाजेपर्यंत अवधीचा टाईम होता. येथील क्लब चालक यांनी वेळेचा अपव्यय घेऊन व नियमाबाह्य एक ते दोन तास नेहमी चालवीत असल्याची माहिती जिल्हा अप्पर पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांना मिळताच या गंभीर घटनेची दखल घेऊन आपल्या कर्मचाऱ्यांसह रात्री ११:३० वाजताच्या सुमारास सापळा रचून कारवाई केली. कारवाईच्या दरम्यान अप्पर पोलीस अधीक्षक व पोलीस कर्मचारी तेथे गेले असता तेथील उपस्थित ८५ ते ९० जुगारी व पोलीस यांच्यामध्ये धक्काबुक्की झाली. त्यामध्ये दोन पोलिस कर्मचारी टिनचे लोखंडी शेडला लागल्यामुळे त्यांना डोक्याला दुखापत झाली. वादाचे तीव्र रूप दिसल्यामुळे जिल्हा अपर पोलीस अधीक्षक यांनी सी ६० कमांडो, व दंगा पथक यांना पाचारण केले. काही वेळांनी दंगा पथक, व सी ६० कमांडो यांच्या सहाय्याने ८५ जुगारी व युथ सोशल क्लब अध्यक्ष व्यंकटेश मल्लया तोटा, रा. तेलंगणा राज्यातील मंचिर्याल यांना विरुर पोलीस स्टेशन येथे दाखल करून गुन्हा दाखल केला. व दोन आरोपी शेर श्रीकांत, श्रीनिवास गंगारेडी हे फरार आहेत.

# महागाईच्या झळा

काळाबरोबर कोणत्याही वस्तूंचे दर वाढत असतात आणि महागाईची चर्चा होत असते; मात्र या दरवाढीच्या झळा थेट स्वयंपाकघरापर्यंत पोहोचतात तेव्हा त्याचे वाईट परिणाम समाजातील सर्व घटकांवर होत असतात. पेट्रोल, डिझेलच्या किमतीतील वाढीमुळे महागाईची चर्चा गेले काही आठवडे सुरूआहे. त्याला अधूनमधून गॅस दरवाढीचा तडका मिळत असतो; परंतु स्वयंपाकाच्या घरगुती वापराच्या गॅसच्या दरातील पन्नास रुपयांची ताजी वाढ सर्वसामान्य माणसाच्या जगण्यावर खोल परिणाम करणारी आहे. आधीच महागाईमुळे हैराण झालेल्या सर्वसामान्यांचे कंबरडे मोडणारी, तसेच स्त्रियांचे बजेट कोलमडवून टाकणारी आहे. ग्रामीण भागातील ज्या स्त्रिया चुलीकडून गॅसकडे वळत होत्या, त्यांना पुन्हा चुलीकडे ढकलणारी ही दरवाढ आहे.




महागाईसाठी आंतरराष्ट्रीय परिस्थितीकडे बोट दाखवले जात असले, तरी ती रोखण्यासाठी तातडीने पावले उचलण्याची गरज आहे, नाही तर सामान्य माणसांचे जगणेच मुश्कील होऊन जाईल. घरगुती वापरासाठी वापरला जाणाऱ्या १४.२ किलोच्या एलपीजी सिलिंडरच्या दरात पन्नास रुपयांची वाढ झाली. या दरवाढीमुळे आता सिलिंडरची किंमत हजारपार गेली आहे. यापूर्वी २२ मार्चला पन्नास रुपयांची दरवाढ करण्यात आली होती. त्यानंतर अवघ्या दीड महिन्यात पुन्हा दिलेला पन्नास रुपयांचा दणका सोसवणारा नाही. ही वाढ घरगुती गॅस सिलिंडरच्या किमतीतील होती. त्यामुळे तिचा फटका थेट ग्राहकाच्या खिशाला बसणार आहे. याशिवाय अप्रत्यक्षपणे खिशाला कात्री लावली जात असते, ते वेगळेच. एक एप्रिलला व्यावसायिक कारणांसाठी वापरल्या जाणाऱ्या एलपीजी सिलिंडरचे दर २५० रुपयांनी वाढवले होते. मे महिन्यात त्यात पुन्हा १०२.५० रुपयांची वाढ करण्यात आली. या वाढीमुळे व्यावसायिक कारणासांठी वापरल्या जाणाऱ्या १९ किलोच्या सिलिंडरचा दर २२५३ रुपयांवर गेला. व्यावसायिक कारणांसाठीच्या दरवाढीचा थेट फटका सर्वसामान्यांना जाणवत नसला, तरी त्याचा भार शेवटी त्यांच्यावरच येत असतो. या व्यावसायिक कारणांपैकी अनेक कारणे थेट महागाईत भर टाकणारी असतात. धंदा परवडत नाही. व्यवसायाचे गणित जमवताना कसरत करावी लागते आणि खर्चाच्या प्रमाणात उत्पन्न मिळाले नाही, तर व्यवसायावर गंडांतर येऊ शकते. मग, दरवाढीशिवाय पर्याय उरत नाही. याची थेट झळ ग्राहकालाच सोसावी लागते. महागाईचे हे दुष्टचक्र सुरू झाले आहे, त्याला वेळीच पायबंद घालण्याची गरज आहे. अन्यथा महागाईवाढीची ही गती अर्थव्यवस्थेला नव्या संकटाला निमंत्रण ठरू शकते. महागाईचा फटका फक्त गरिबांना बसतो आणि मध्यमवर्गीय, तसेच श्रीमंत वर्गावर काही परिणाम होत नाही, असे समजण्याचे कारण नाही. सगळ्याच घटकांना महागाईच्या झळा जाणवत असतात. प्रत्येकाच्या जीवनशैलीनुसार त्या कमी-जास्त प्रमाणात असू शकतात. फरक एवढाच आहे की, महागाईचा फटका गरिबांना बसतो तेव्हा थेट तो त्यांच्या पोटावर बसत असतो. पेट्रोल, डिझेलचे विशेषतः डिझेलच दर वाढतात तेव्हा वाहतुकीच्या साधनांचे दर वाढत असल्यामुळे जीवनावश्यक वस्तूंच्या किमतीवर त्याचा विपरीत परिणाम होत असतो. जीवनावश्यक वस्तूंच्या किमतीत वाढ होते, तेव्हा त्याची झळ थेट गरिबांना बसत असते. दोन वेळा हातातोंडाची गाठ पडणे अनेकांसाठी कठीण बनते. लहान मुलांना आवश्यक पोषणतत्त्वे मिळत नाहीत आणि घरातल्या वृद्धांनाही आवश्यक ते अन्नघटक मिळू शकत नाहीत. कमीतकमी किमतीत उपलब्ध होईल ते खाऊन दिवस ढकलण्याला प्राधान्य दिले जाते. मधल्या कोरोना काळात तळागाळातल्या घटकांतील लाखो लोकांवर बेरोजगारीची कुऱ्हाड कोसळली. ज्यांचे रोजगार टिकले, त्यांची मजुरी घटली. स्वयंरोजगार करणाऱ्या छोट्या व्यावसायिकांचे उत्पन्न घटले. त्यामुळे रोजची जगण्याची लढाई त्यांच्यासाठी अटीतटीची बनली आहे. अशा स्थितीत जेव्हा जीवनावश्यक वस्तूंच्या किमतीत वाढ होते, तेव्हा त्यांना पोटाला चिमटा घेण्यावाचून पर्याय उरत नाही. एकीकडे गरिबांची ही अवस्था असताना कनिष्ठ मध्यमवर्गीयांपासून उच्च मध्यमवर्गीयांपर्यंतच्या घटकांनाही महागाईची झळ सोसावी लागत आहे. अलीकडेच रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने रेपो दरात वाढ केल्यामुळे मध्यमवर्गीयांचे आर्थिक गणितही - कोलमडले. जागतिक बाजारपेठेतील वस्तूंच्या वाढत्या किमती आणि पेट्रोल, डिझेलसह इतर इंधनांच्या वाढत्या किमतीच्या दबावामुळे रेपो दरात बदल करावा लागल्याचे रिझर्व्ह बँकेचे म्हणणे आहे. रेपो दर चार टक्क्यांऐवजी ४.४० टक्के झाला आहे. जूनपासून रेपो दरात वाढ होऊ शकते, असा तज्ज्ञांचा कयास होता; परंतु त्याआधीच दरवाढीचा धक्का दिला गेला. त्याचा परिणाम येत्या काळात बँकांच्या व्याजदरावर होईल. गृहकर्जापासून ते वाहन कर्जापर्यंत, वैयक्तिक कर्ज, शैक्षणिक कर्जे आणि इतर सर्वच कर्जे महाग होतील. जुन्या कर्जाचे हप्ते वाढतील. महागाई नियंत्रित करण्यासाठी रेपो दरवाढीचा निणऱ्य घेतल्याचा युक्तिवाद केला असला, तरी या वाढीमुळे होणारा परिणाम महागाईपेक्षा गंभीर आहे. शिवाय दुसरीकडे महागाईचा आलेख वरवर चालला आहे, तो वेगळाच. रिझर्व्ह बँकेने रेपो दरात वाढ केल्यानंतर फेडरेशन ऑफ ऑटोमोबाईल डीलर असोसिएशनने तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. वाहन कर्ज महागल्यामुळे पुन्हा उभारी घेत असलेल्या ऑटोमोबाईल क्षेत्राला फटका बसणार असल्याचे संबंधितांचे म्हणणे आहे. मधल्या कोरोनाच्या काळात दुचाकी क्षेत्राची ग्रामीण भागातील कामगिरी फारशी समाधानकारक नव्हती. कोरोनानंतर परिस्थिती सुधारत असताना सातत्याने होणारी इंधनवाढ आणि आता महागणारी कर्जे याचा फटका बसू शकतो. उद्योग, बँकिंग, कृषी, शिक्षण, दळवळण ही सारीच प्रमुख क्षेत्रे बाधित होत आहेत. महागाईची झळ बसलेली नाही, असे एकही क्षेत्र दिसत नाही. त्यामुळे बेकारी, बेरोजगारीत भर आलीच. महागाईच्या झळांनी होणारी ही होरपळ थांबवण्यासाठी वेळीच पावले टाकली गेली पाहिजेत.

प्रासंगिक

# खरीप हंगामात शेतकऱ्यांची फसवणूक होऊ नये



डॉ.यशवंत घुमे
मो. ९८२२२३३९१२
sahyandrinews@gmail.com

**मे महिना सुरू झालेला आहे. जूनपासून शेतकऱ्यांची खरीप हंगामातील पिके शेतात पेरण्यासाठी लगबग सुरू होणार आहे. त्यासाठी शेतकरी पेरणीपूर्व कामे करण्यात व्यस्त झाले आहेत. या शेतीच्या मशागतीतून कठोर परिश्रम करीत पुढील वर्षी शेतात भरपूर पिकू दे आणि घरातील, कुटुंबातील, परिवारातील सदस्यांच्या पोटात चार घास सुखाचे जाऊ दे. अशी स्वप्ने पहात या मे महिन्यातील रखरखत्या उन्हात शेतकरी घाम गाळत आहेत. आपल्या शेतीची मशागत करत आहेत. ती करताना त्याला न खाण्याची भान राहत, पाणी पिण्याचं. कठोर परिश्रम करत शेतीची मशागत करून शेतीला पेरणीसाठी सुसज्ज करायचे हेच त्याचे ध्येय असते.**

परंतु शेती आणि शेतकऱ्यांच्या स्वप्नांमध्ये आडकाठी येते ती बोगस बियाण्यांची. शेतामध्ये जे बीज पेरले जाते. त्याच्या खरे-खोटेपणाची शाश्वती नसते. अनेकदा बाजारातून आणलेले कृषी बीज दोषपूर्ण असल्याने ते बियाणे पाहिजे त्या प्रमाणामध्ये उगवत नाही. उगवण क्षमता नसलेले बियाणे कृषी केंद्रामधून दुकानदार विकत असल्यामुळे अनेकदा शेतकऱ्यांची क्रूर थट्टा होते. मोठ्या मेहनतीने कसलेली जमीन बांड जाते.वर्षभर मेहनत करीत बघितलेले स्वप्न या बोगस बियाणांमुळे होरपळून जातात. करपून जाते.

शेतकरी आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी नसल्याने कसेतरी इकडून तिकडून उसनमानीने आणलेले पैसे, बँकांकडून घेतलेले कर्ज अथवा बचत गटांकडून टक्केवारीने आणलेले उचल यातून शेतकरी शेतीचे व्यवस्थापन करतो. आपल्या शेतामध्ये बीज पेरणीसाठी कृषी केंद्रातून बियाणे विकत आणतो. परंतु अलीकडील अनुभव पाहता अनेकदा बाजारातून आणलेल्या बियाणात शेतकऱ्यांची फसवणूक होते. शेतकऱ्यांच्या या फसवणुकीला जबाबदार कोण? हे निश्चित झाले पाहिजे. मशागत करून कसदार बनवलेल्या शेतात बीज पुरवल्यानंतर जर ते उगवतं नसेल तर या फसवणुकीसाठी ज्या कृषी केंद्रातून बीज आणले. त्या कृषी केंद्र मालकांवर कठोर कारवाई झाली पाहिजे. शेतकऱ्यांच्या स्वप्नांशी खेळणाऱ्या अशा दुकानदारांवर जर प्रशासनाने कठोर कारवाई केली तर निश्चितच कुठलाही दुकानदार बोगस बियाणे शेतकऱ्यांना देण्याची हिम्मत करणार नाही.

शेतकऱ्यांच्या अज्ञानाचा गैरफायदा घेऊ नये, शेतकऱ्यांच्या आयुष्याशी खेळू नये यासाठी कृषी दुकानांवर शासनाच्या कृषी विभागाने हंगामात कडक नजर ठेवली पाहिजे. शेतकऱ्यांचे आर्थिक व मानसिक नुकसान होणार नाही यासाठी दक्ष असले पाहिजे. उगवण क्षमता नसलेल्या बियाणे पेरणीतून केवळ एका शेतकऱ्याचीच स्वप्न भंग होतात असे नाही. तर त्या शेतकऱ्याच्या भरोशावर अवलंबून असलेल्या परिवारातील अनेकांची स्वप्न □भंग होतात. एकदा बियाणे बांड गेलं म्हणजे वापले वा उगवले नाही तर पुन्हा दुसऱ्यांदा बियाणे विकत घेण्यासाठी शेतकऱ्यांची आर्थिक कुवत राहत नाही. अनेकांची सामाजिक पत नसल्याने पुन्हा भांडवल उभे होत नाही. परिणामतः शेतकऱ्यांना शेती मोडण्याची किंवा नकोसे निणऱ्य घेण्याची पाळी येते. जुन महिन्यात पेरणी काळ शेतकऱ्यांसाठी नाजूक काळ असतो. अशा अवस्थेत ना सांगता येत ना लपवता येत अशी शेतकऱ्यांची स्थिती असते.केवळ नशीबाला दोष देणं एवढंच त्याच्या हातात असतं.

हे टाळण्यासाठी प्रशासनाने बोगस व उगवणक्षमता नसलेले बियाणे विकणाऱ्या कृषी केंद्रांवर कठोर कारवाईची पाऊले उचलली पाहिजेत. दुसरे असे की, आर्थिक फसवणूक होणार नाही यासाठी दुकानाच्या दर्शनी भागावर सगळ्यांना सहज दिसेल अशा ठळक जागेवर भावफलक व उपलब्ध साठा यांची माहिती लिहिलेले फलक लावण्यात आले पाहिजे. अनेकदा कृषी दुकानदार आपल्या दुकानासमोर आपल्या दुकानासमोरील दर्शनी फलकावर मालाची उपलब्धता आणि त्याचा आजचा विक्री भाव लिहून ठेवत नाही. त्यामुळे खेड्यापाड्यातून येणाऱ्या निरक्षर शेतकऱ्यांची आर्थिक फसवणूक होते. बरेचदा दुकानदार शेतकऱ्यांना मनमानी किमतीने बियाणे विकतात. अशा तक्रारी वारंवार ऐकायला मिळतात. कृषी अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांना त्याच्या कृषी केंद्राच्या दर्शनी भागावर भावफलक व उपलब्ध साठा लिहून ठेवणे सक्तीचे केले पाहिजे. त्यामुळे शेतकऱ्यांची आर्थिक फसवणूक होणार नाही. शेतकऱ्यांची आर्थिक लुट टाळण्यासाठी मानवतावादी दृष्टिकोन ठेवून कृषी केंद्रांवर लक्ष ठेवून शासकीय निर्णयाची अंमलबजावणी होणार नाही होते की नाही हे पाहणे आवश्यक आहे. बरेचदा दुकानदार कृषी अधिकाऱ्यांचा आशीर्वाद असल्याप्रमाणे बेभाव बियाणे विकतात व नाईलाजास्तव ते शेतकऱ्यांना विकत घ्यावे लागते. या आर्थिक पिळवणुकिला जबाबदार कोण? हे निश्चित केले पाहिजे. कोणावर तरी फिक्स जबाबदारी टाकायला पाहिजे.

शासनाने ठरवले की, ज्या कृषी अधिकाऱ्याच्या क्षेत्रात बोगस बियाणांची विक्री केली जाईल त्यासाठी संबंधित क्षेत्रातील कृषी अधिकारी जबाबदार धरण्याचे धोरण अवलंबिले तर कृषी अधिकारीही प्रामाणिकपणे दुकानांवर लक्ष ठेवून अशी फसगत होणार नाही यासाठी दक्ष असतील. कृषी क्षेत्रात अनेक अधिकारी अजूनही प्रामाणिक आहेत. परंतु त्यांना प्रत्यक्षात काम करताना अडचणी येतात. तांत्रिक कारणामुळे अडचण होत असते. परंतु जर हे टाळता आले तर शेतकऱ्यांच्या आर्थिक नुकसानीला दूर करता येईल. भारत हा कृषिप्रधान देश आहे. भारतातील अनेक शेतकरी वर्षातील दहा महिने शेती करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवत असतात. मुलांच्या शिक्षणाची, मुलींच्या लग्नाची स्वप्ने पहात ही अपूर्ण स्वप्न पहात वर्षभर राबराब राबणाऱ्या, घाम गाळणाऱ्या शेतकऱ्यांच्या स्वप्नांचा कोणी विचार करणार का? असा प्रश्न या निमित्ताने उपस्थित होतो. तेव्हा असे वाटते की, महाराष्ट्र शासनाच्या अंतर्गत जिल्हा परिषद, पंचायत समिती व शासकीय विभागांतर्गत कृषी कार्यालय आहेत. या कार्यालयांनी तज्ज्ञ मार्गदर्शकांकडून शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी निःशुल्क शिबिरे आयोजित करायला पाहिजे. हे काही प्रमाणात होत असेलही, परंतु त्याला तज्ज्ञ मार्गदर्शक मार्गदर्शकांच्या ज्ञानाचा फायदा निश्चितच शेतकऱ्यांना मिळेल. आपल्या शेतातील पीक कसे वाढवता येईल?याचे प्रशिक्षण शेतकऱ्यांना दिले पाहिजे. बदलत्या काळात तांत्रिक ज्ञान नसल्यामुळे शेतकरी आर्थिकदृष्ट्या मागासलेले राहतात. त्या तुलनेत कृषी अधिकारी हे पुस्तकी ज्ञानाने जाणकार असतात. त्यांच्या ज्ञानाचा फायदा मिळाला तर निश्चितच कृषी क्षेत्राला भवितव्य आहे. परंतु अनेक कृषी अधिकारी केवळ कागदोपत्री दौरे दाखवून कर्तव्याकडे दुर्लक्ष करत असल्याचे निदर्शनास आले. परिणामतः कास्तकारांना योग्य मार्गदर्शनाला मुकावे लागते. यासाठी प्रामाणिकपणे शेतकऱ्यांसाठी मार्गदर्शन शिबिरे राबविली गेली पाहिजे. कृषी केंद्रातून बोगस बियाणे विकले जाणार नाही,तशी विक्री होणार नाही यासाठी काहीतरी ठोस उपाययोजना शासनाने अवलंबिल्या पाहिजे. असे झाले व त्याची प्रामाणिक अंमलबजावणी झाली तर शेतकऱ्यांची फसगत निश्चितच टाळता येईल. व सरकारही शेतकऱ्याची प्रामाणिक आहे याची यानिमित्ताने प्रचिती येईल.

अलीकडल्या काळात शेतकऱ्यांच्या शेतात एकतर नीट पिकत नाही, पिकले तर विकताना योग्य भाव मिळत नाही. अशा अनेक अनंत अडचणींचा सामना करत शेतकऱ्यांना शेती करावी लागते. वर्षभर राबराब राहूनही पाहिजे त्या प्रमाणात उत्पन्न होत नसल्यामुळे रसायनिक शेती करत असताना आर्थिक भार जास्त पडत असल्यामुळे निव्वळ नफा शेतकऱ्याला मिळत नाही. किंवा मिळाला तरी फार कमी मिळतो. परिणामतः शेतकऱ्यांना आर्थिक स्थैर्य लाभत नाही. आपल्या देशात हाताच्या बोटावर मोजता येतील इतक्याच शेतकऱ्यांच्या घरात आर्थिक स्थैर्य असेल. अनेकांच्या घरात आर्थिकदृष्ट्या मागासले पण असते. त्यामुळे अनेकांना इच्छा असूनही आपल्या मुलांना चांगल्या प्रकारचे शिक्षण देता येत नाही. इच्छा असूनही आपल्या मुलीसाठी चांगले घर शोधता येत नाही. शेवटी शेतकरीही माणसंच आहेत. साहेबांच्या लालफितीत अडकली आहे. समाज, शासन, प्रशासनाने शेतकऱ्यांच्या भवितव्याचा विचार करीत त्यांना नवनवीन योजना समजून सांगितल्या पाहिजे. अनेकविध उपक्रम शिकवले पाहिजे. नवनवीन प्रकारच्या बियाण्याच्या वापराबाबत मार्गदर्शन शिबिर घेतले पाहिजे. असे जर झाले तर कृषी क्षेत्रात काम करणारे अनेक लोक निश्चितच पुढे आल्याशिवाय राहणार नाही. नापिकीमुळे त्रस्त होऊन ऊठसूट शेती विकणारे, शेती मोडणारे शेतकरी बांधव शेतीच्या व्यवसायाकडे वळतील व भारत खऱ्या अर्थाने सुजलाम सुफलाम होईल म्हणून शासनाने शेतकऱ्यांची कदर केली पाहिजे. भुकेल्या पोटात दोन घास खाऊ घालणाऱ्या अन्नदात्याचा आत्मसन्मान कसा राखता येईल यासाठी कसोशीने प्रयत्न केले पाहिजेत. त्यासाठी शासन, प्रशासन व समाजानेही आपापले भरीव योगदान दिले तर भारत सोने की चिडिया निश्चितच बनेल असे वाटते. दुकानदारांनीही शेती व शेतकऱ्यांप्रती नैतिकता जपत वाजवी किमतीत रासायनिक खते, उत्तम प्रकारे उगवणक्षमता असलेले बी-बियाणे उपलब्ध करून देणे नैतिक कर्तव्य समजले पाहिजे.सगळेच घटक एकत्र येऊन शेतीच्या प्रगतीसाठी आवश्यक प्रयत्न करायला पुढे सरसावले तर शेती नक्कीच प्रतिष्ठित व्यवसाय होईल असा विश्वास वाटतो.



# बदललेल्या शिक्षण पद्धतीनुसार शिक्षकांनी अपडेट होणं काळाची गरज


गुरू ब्रम्हा
गुरु विष्णु
गुरुदेवो महेश्वरा
गुरु साक्षात परब्रम्ह
तस्मैश्री गुरुवे नमः



गोपाल भा. गुडधे, वरोरा
मो.७२१८१३८३७९
sahyandrinews@gmail.com

हा श्लोक आणि त्याचा अर्थ अलीकडच्या काळात आऊटडेटेड होण्याच्या मार्गावर असल्यासारखे चित्र पहावयास मिळत आहे . पान टपरीवर किंवा एखाद्या सार्वजनिक ठिकाणी शिक्षक हा विषय निघाला तर आता बोलणा-यांची भाषा बदलायला लागलेली दिसते . साधारणतः १९६५ पूर्वीचा काळ हा शिक्षकांसाठीचा सुवर्ण काळ मानल्या जातो . त्यावेळी शिक्षकांप्रति विद्यार्थ्यांच्या मनात असलेला आदरभाव व समाजातील शिक्षकांचे स्थान उच्चकोटीचे होते . शिक्षक आपल्या विद्यार्थ्यांप्रति समर्पित होते आणि आपले सामाजिक उत्तदायित्व ही अत्यंत निष्ठेने पार पाडायचे . समाज सर्व प्रकारच्या आदर्शांची अपेक्षा शिक्षकांकडूनच करीत होता आणि शिक्षक त्या परिभाषेत चपखल बसायचे . आजही आपल्या ज्या शिक्षकांनी आपल्याला इयत्ता पहिली ते दहावी पर्यंत शिकविले त्या शिक्षकांपैकी आपले गुरुजन जर आपल्याला मिळाले तर नकळत आपण त्यांचे चरणस्पर्श करण्यासाठी पुढे सरसावतो . पण आता काळ बदलत गेला . नवनवीन शैक्षणिक धोरणं येत गेलीत , सरकारची आर्थिक धोरण बदललीत , छडी लागे छम छम ... चा काळ जावून आनंददायी शिक्षणाच्या प्रवाहात आमची ग्रामिण भागातली पिढी या स्पर्धेच्या युगात कुठतरी हरवल्यासारखी वाटत आहे . नापासी बंद झाल्यापासून एखादा विद्यार्थी ज्याला अगदी काहीच येत नाही तो सुद्धा इयत्ता आठवीपर्यंत पुढे ढकलल्या जातोय आणि नंतर नववी फेल किंवा दहावी फेल नावाची डिग्री घेवून शाळा बाह्य होतोय . ग्रामीण भागातल्या पिढ्या न पिढ्या बरबाद होतांना दिसत आहेत . शैक्षणिक धोरणांमधून समाजाला दाखविलेलं हिरवगार चित्र प्रत्यक्षात मात्र कधी उतरलेलं दिसलं नाही . सुप्रसिद्ध कवी डॉ. यशवंत मनोहर यांच्या भाषेत सांगायचे तर 'कालचा पाऊस आमच्या गावात आलाच नाही' असे चित्र बघावयास मिळत आहे.

शिक्षणातून देशप्रेमाने ओतप्रोत भरलेली पिढी निर्माण व्हावी हा तर उद्देश असतोच पण शिक्षणाच्या , भरवशावर त्या विद्यार्थ्याला स्वतःच्या पायावार उभे राहता यावे एवढीच अपेक्षा रास्तच आहे . ग्रामीण भागातील प्राथमिक शिक्षणातून जी मुलं बाहेरगावी पदवी पर्यंतचे शिक्षण घेण्यासाठी बाहेर पडतात त्यांना पदवीनंतर हे लक्षात येतं की केवळ पदवीच्या भरोशावर आपला रोजगार उभा होणार नाही. तेव्हा आता पुढे काय ? हा प्रश्न त्याच्यासमोर नक्कीच उभा राहतो . या वेळी त्या विद्यार्थ्यांना त्यांचे प्राथमिक शाळांमधले शिक्षक आठवले पाहिजेत . बदललेल्या सामाजिक परिस्थितीत प्रत्येक विद्यार्थ्यांमधील कलागुणांना हेरुन त्यांनी भविष्यात कोणत्या दिशेला जायला पाहिजे हे त्यांना त्यांचे शिक्षकच चांगल्या प्रकारे सांगू शकतील . या विद्यार्थ्यांपैकी किती विद्यार्थी शिक्षणात पुढे जावू शकतील , किती विद्यार्थ्यांनी रोजगाराभिमुख शिक्षणाकडे लक्ष देण्याची गरज आहे हे केवळ त्यांचे प्राथमिक शिक्षणापासून सोबत असलेले गुरुजन त्यांना व्यवस्थित सांगू शकतील. नियोजन शून्यतेअभावी आपल्या मुलांना इयत्ता दहावी नंतर मी कोणतं शिक्षण घेतल पाहिजे याचा निर्णय व्यवास्थित घेता येत नाही . ग्रामीण भागात पालक वर्ग मुलांच्या पुढील शिक्षणाच नियोजन करता येण्याइतका सक्षम नसतो . ही जबाबदारी शिक्षकांनीच सांभाळायला हवी . शिवाय बदललेल्या शैक्षणिक वातावरणात आपले ब-यापैकी हुशार विद्यार्थी जीवघेण्या स्पर्धेत स्पर्धा परीक्षांमध्ये टीकावीत यासाठी शिक्षकांनी स्वतः अपडेट असलं पाहिजे . आपल्या विद्यार्थ्यांच्या जडणंघडणीत शिक्षकांची भूमिका फार महत्वाची असते . त्याला



योग्य मार्ग जर आपण दाखवू शकलो नाही तर समाज आमच्यासाठी भाषेची हद्द पार केल्या शिवाय रहाणार नाही एवढे निश्चित .

बदललेल्या आर्थिक धोरणानुसार रोजगार उपलब्ध करुन देणं हे सरकारचे काम राहिलेलं नाही . दरवर्षी दोन कोटी रोजगार उपलब्ध करुन देवू ही फक्त निवडणुकांपूर्वीची घोषणा . गेल्या पाच ते सहा वर्षात सरकारी कार्यालयातील रिक्त जागा भरतांना होत असलेली दिरंगाई , कॉन्ट्रॅक्ट बेसिसवर भरली जाणारी पदं , कोणत्याही मानधनावर काम करण्यास तयार असलेला मोठा बेरोजगार वर्ग याकडे बघितल्यावर तरी आता यापुढे सरकारी नोक-यांची अपेक्षा आपण न केलेली बरी . रोजगाराभिमुख विविध विभागांकडे मुलांनी जाण्याची गरज आहे . देशाला गरज असलेला मॅन पॉवर कोणत्या क्षेत्रात आहे हे शोधता आलचं पाहिजे आणि त्या दृष्टीकोनातून आपल्या शिक्षणाच नियोजन करता आलं पाहिजे . म्हणून ही जबाबदारी शिक्षकांनीच सांभाळून आपल्या विद्यार्थ्यांच्या मनात एक कधीही न तुटणारं नात तयार करण्यासाठी पुढं येण्याची गरज आहे . या मुलांच्या भरोशावरच आपली मुलं पोट भरतात हे सत्य नाकारुन चालणार नाही .

## संक्षिप्त

### कोटगुल येथे महाराजस्व अभियान शिबिर

**कोरची :** तालुका मुख्यालयापासुन अंदाजे ३५ किलोमीटर अंतरावर असलेल्या पोलिस स्टेशन कोटगुल येथे शासनस्तरावरुन लोकोपयोगी योजना पोहचविण्यासाठी आझादी का अमृतमहोत्सव व महाराजस्व अभियान कार्यक्रम शुक्रवारी ०६ मे ला आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात विविध प्रकारचे ८६२ दाखले लाभार्थ्यांना वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे उद्घाटन कुरखेडा उपविभागीय अधिकारी दर्शन निकाळजे यांच्या हस्ते झाले. प्रमुख अतिथी म्हणून कोरची तहसीलदार सी आर भंडारी, कृषी अधिकारी लाकेश कटरे, कोटगुल पोलिस स्टेशन अधिकारी आनंद जाधव, माजी पंचायत समिती सभापती श्रावनकुमार मातलाम, सरपंच परमेश लोहंबरे, प्रतिष्ठित व्यापारी चंदन शेखावत व तलाठी, कोतवाल, महसूल कर्मचारी व कोटगुल परिसरातील हजारोच्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

### श्री. कन्यका माता जयंती निमित्त पालखी शोभायात्रा

**चंद्रपूर :** श्री. माता वासवी कन्यका देवी यांच्या ८५ व्या प्राणप्रतिस्थापना दिन आणि जन्मोत्सवा निमित्त आर्य वैश्य समाजाच्या वतीने काढण्यात आलेल्या पालखी शोभायात्रेचे यंग चांदा ब्रिगेडच्या वतीने जटपुरा गेट, चंद्रपूर येथ स्वागत करण्यात आले. यावेळी शोभायात्रेत सहभागी झालेल्या समाज बांधवांसाठी यंग चांदा ब्रिगेडच्या वतीने शितपेयाचीही व्यवस्था करण्यात आली होती.

### नेत्ररुग्णांची बारावी तुकडी सेवाग्राम येथे रवाना

**चंद्रपूर :** आ. सुधीर मुनगंटीवार आरोग्य सेवा समिती महाराष्ट्र घुग्घुसतर्फे भाजपा जिल्हाध्यक्ष देवराव भोंगळे यांच्या नेतृत्वात व भाजयुमो प्रदेश उपाध्यक्ष विवेक बोढे यांच्या मार्गदर्शनात भाजयुमो प्रदेश उपाध्यक्ष विवेक बोढे यांचा मुलगा चि. शौर्य बोढे यांच्या वाढदिवसानिमित्त शनिवार ७ मे रोजी घुग्घुस परिसरातील जेष्ठ नागरिकांची तुकडी सेवाग्राम येथील कस्तुरबा गांधी रुग्णालयात मोतीबिंदूच्या उच्चस्तरीय तपासणी करिता एक तुकडी पाठविण्यात आली.

### राज्यस्तरीय कविसंमेलनाचे आयोजन

**औरंगाबाद :** क्षितिजावरची शब्दपर्णवी साहित्य समुहातर्फे राज्यस्तरीय कविसंमेलनाचे आयोजन १९ जून रोजी औरंगाबाद येथे करण्यात येत आहे.
या कविसंमेलनात पुस्तक प्रकाशन सोहळा व पुरस्कार वितरण सोहळा ही घेण्यात येणार आहे.
क्षितिजावरची शब्दपर्णवी साहित्य समुह नवोदित कविना व्यासपीठ उपलब्ध करुन देण्यासाठी विविध प्रकारे उपक्रम व स्पर्धा घेत असतो. नवोदित कविना व्यासपीठावर व्यक्त होता यावे व प्रस्थापित कविचे अनुभव, त्याच्या लेखणीची परिपक्वता, त्याचा लेखन प्रवास जवळुन अनुभवता यावा म्हणून हे कविसंमेलन घेण्यात येत आहे
संमेलनात दोन सत्र असतील.. प्रथम सत्रात ग्रंथ पुजन, दीपप्रज्वलन स्वागत गीत, पुरस्कार वितरण व पुस्तक प्रकाशन. होईल .

### खरीप हंगामासाठी एक कोटीचे पीककर्ज वाटप

**राजुरा :** भेंडवी आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्थेने कार्यक्षेत्रात येणाऱ्या शेतकऱ्यांना खरीप हंगामाच्या तोंडावर पीककर्ज वितरीत केल्याने त्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. संस्थेने आतापर्यंत एक कोटी पेक्षा जास्त पिककर्जाचे वाटप केले आहे.

# ठिबक सिंचनाचा टक्का वाढतोय

## ड्रिंपमध्ये १३ लाख ६६ हजार १२५ हेक्टर सिंचनाखाली : विदर्भाचा डंका कायम



**चंद्रपूर/ प्रतिनिधी**
राज्यातील १३ लाख ६६ हजार १२५ हेक्टर शेती क्षेत्र ठिबक सिंचनखाली आले आहे. 'ठिबक'खालील टक्का वाढत आहे. 'स्प्रिंकलरमध्ये मात्र विदर्भाची आघाडी राहिली आहे. राज्यात एकूण २५ लाख ७२ हजार हेक्टर क्षेत्र सूक्ष्म सिंचनाखाली आले आहे. महाविकास आघाडी सरकारने 'ठिबक', 'तुषार'साठीच्या अनुदानासाठी भरीव तरतूद केली आहे.
चालू वर्षासाठी ५८९ कोटी रक्कम शासनाने यासाठी मंजूर केली. आहे. मात्र, हे अनुदान लाभार्थी शेतकऱ्यांना नियमित मिळणे गरजेचे आहे; तरच याचा खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांना लाभ होणार आहे. राज्यात १३ लाख ६६ हजार हेक्टर क्षेत्र ठिबक सिंचनाखाली आले आहे. यात सर्वाधिक म्हणजे ३ लाख ७६ हजार ९४३ हेक्टर क्षेत्र कापूस पिकाखाली.
आहे. हे क्षेत्र राज्याच्या एकूणपैकी २७.५९ टक्के इतके आहे. राज्यात २ लाख २५ हजार ७८९ हेक्टर उसाचे क्षेत्र ठिबक खाली आहे. राज्याच्या क्षेत्रापैकी हे क्षेत्र १६.४८ टक्के आहे. राज्यात १ लाख २४ हजार ४४३ हेक्टर डाळिंब आणि केळी पिकासाठी १ लाख ४९ हजार ३८१ हेक्टर तसेच १ लाख ८९ हजार ५२२ हेक्टर द्राक्षाचे क्षेत्र ठिबकखाली आले.
ठिबक सिंचनखालीदिखील क्षेत्र वाढत गेले आहे. सन २००९-१०मध्ये राज्यात ९१ हजार ५८ ठिबक'सिंचनचे संच कार्यरत होते. यातून ८१ हजार ६६० हेक्टर क्षेत्र भिजले होते.
सन २०१०-२०११ मध्ये १ लाख ४० हजार ७६४ ठिबकचे संच होते, तर १ लाख २७ हजार ९६७ हेक्टर क्षेत्र ठिबकखाली आले होते. सन २०१४-२०१५ मध्ये तर ठिबकचे तब्बल २ लाख ४९६ संच कार्यरत झाले. तर यातून १ लाख ७० हजार ७१९ हेक्टर क्षेत्रातील पिके ठिबकखाली आली होती. आजच्या घडीला म्हणजे २०२२ मार्चअखेर राज्यात ठिबक सिंचनाखालील क्षेत्रात प्रचंड वाढ झाली आहे. तब्बल १३ लाख ६६ हजार हेक्टर क्षेत्र बागायती झाले. आहे. ठिबकमध्ये राज्यात पश्चिम महाराष्ट्राचीच आघाडी आहे, पश्चिम महाराष्ट्रात तब्बल ८ लाख ५२ हजार २९७ हेक्टर ठिबकखाली आहे.


**ठिबक सिंचन (क्षेत्र हे.) जिल्हा पश्चिम महाराष्ट्र**
- सोलापूर : १ लाख ४६ हजार ७६५
- अहमदनगर : ८६ हजार २३०
- पुणे : ६८ हजार १४१
- सांगली जिल्हा : ६० हजार ८२२
- सातारा जिल्हा : २४ हजार ९४५
- सांगली जिल्हा : ६० हजार ८२२
- कोल्हापूर : ११ हजार ९४९

**ठिबक राज्यात पीकनिहाय (हे.)**
- कापूस : ३ लाख ७६ हजार ९४३
- ऊस : २ लाख २५ हजार ७८९
- केळी : ९ लाख ४९ हजार ३८१
- डाळिंब : १ लाख २४ हजार ४४३
- द्राक्ष : १ लाख ८९ हजार ५२२
- भाजी पिके : १ लाख ८६ हजार
- आंबा : १९ हजार १२४
- एकूण : १३ लाख ६६ हजार १२५

**ठिबक (क्षेत्र हेक्टर) : विभागनिहाय, विभागात सर्वाधिक.**
- कोकण : १२ हजार ८४२, ठाणे : ५ हजार ३५५
- प. महाराष्ट्र : ८ लाख ५२ हजार २९७, सोलापूर : १ लाख ४६ हजार ७६५
- मराठवाडा : ३ लाख २४ हजार ९४४, औरंगाबाद : ७६ हजार ५३९
- विदर्भ : १ लाख ७५ हजार ९१५, बुलडाणा : ६५ हजार २१८

# १४ तारखेला अनेकांचे मास्क काढणार; मुख्यमंत्र्यांचा इशारा

**मुंबई / प्रतिनिधी**
राज्यात सध्या विचारांचं प्रदूषण होत आहे. विकृत विचार मांडले जात आहेत. बऱ्याच दिवसांनी मास्क काढून भाषण करतोय, मात्र १४ तारखेला अनेकांचा मास्क काढणार



आहे, असा इशारा मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी विरोधकांना दिला.
मुंबई महानगरपालिकेच्या सर्वांसाठी पाणी योजनेचा शुभारंभ मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते शनिवारी गोरेगाव येथे झाला.
यावेळी कार्यक्रमाला शालेय शिक्षण मंत्री वर्षा गायकवाड, वस्त्रोद्योग-मत्स्यव्यवसाय मंत्री तथा मुंबई शहर जिल्ह्याचे पालकमंत्री अस्लम शेख, पर्यटन पर्यावरण मंत्री तथा मुंबई उपनगर जिल्ह्याचे पालकमंत्री आदित्य ठाकरे, महानगरपालिका प्रशासक इक्बाल सिंह चहल यांच्यासह सत्तारूढ शिवसेनेचे विविध नेते आणि महापालिकेचे अधिकारी उपस्थित होते.
वेगळे काही राजकीय बोलून पाणी गढूळ करणार नाही, असे सांगतानाच मुख्यमंत्र्यांनी नेहमीप्रमाणे टोमणे मारण्याची संधी साधलीच. मुख्यमंत्री म्हणाले, एक तर काम करू द्यायचे नाही आणि केले तर भ्रष्टाचार झाला असे म्हणत ओरडत सुटायचे. राजकारण जरुर करा, 'पण राजकारणातही एक दर्जा असला पाहिजे. विरोधी पक्ष म्हणजे काय? नुसता विरोध करणे म्हणजे विरोधी पक्ष नाही. सरकार चुकत असेल तर जरूर कान उपटा, पण सरकार चांगलं काम करत असेल, तर कौतुक करण्याचीदेखील एक दिलदारी पाहिजे, जी आजच्या विरोधी पक्षात नाही.
आतासभेला तर सुरुवात झालेलीच आहे, १४ तारखेला तर मी सभा घेतोच आहे, पण ही सभा म्हणजे उठसूठ इकडे वार तिकडे वार असं नाही करणार, जे काय माझ्या मनात आहे ते मी बोलणार आहे. माझं काही तुंबलेलं नाही, पण मनामध्ये ज्या गोष्टी आहेत, त्या सगळ्या गोष्टी सांगायच्या आहेत, असे संकेतही यावेळी दिले.
सर्वांसाठी पाणी धोरण असणारी मुंबई महापालिका पहिली आहे, याचा अभिमान वाटतो. पण, नळातले पाणी दाखवायचे नाही आणि तुंबलेले पाणी दाखवायचे, असा प्रकारसुरू आहे. मात्र, हिंदमाताला पाणी साचू नये यासाठी प्रयत्नशील असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले. येत्या काळात जास्तीत जास्त इलेक्ट्रिक बस शहरात चालवणारी मुंबई महापालिका ही पहिला महापालिका असणार आहे.
मी पक्का मुंबईकर आहेच आणि एका गोष्टीचा नक्की अभिमान आहे की, मुंबईत जन्मलेला हा राज्याचा पहिला मुख्यमंत्री आहे. मी हाच विचार करत होतो की, कालच्या १ मे रोजी संयुक्त महाराष्ट्राला ६२ वर्षे झाली आणि ६२ वर्षांपूर्वी माझे अजोबा त्या संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या नेत्यांपैकी एक नेते होते. पहिल्या 'पाचमधील एक होते. बदलती मुंबई बघतच आम्ही मोठे झालो आहोत. तेव्हाची मुंबई कशी होती, आताची कशी आहे आणि उद्याची कशी असणार? हा एक मोठा प्रश्नच आहे.

# यूपीत आता रस्त्यांवरील धार्मिक कार्यक्रमांना बंदी

## मुख्यमंत्री आदित्यनाथ योगींचा मोठा निर्णय

**लखनऊ / वृत्तसंस्था**
धार्मिक स्थळांवरील अनधिकृत भोंगे उतरवल्यानंतर आता उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी आणखी एक मोठा निणऱ्य घेतला आहे. त्यानुसार, आता यूपीमध्ये रस्त्यांवर कुठलेही धार्मिक करता येणार नाहीत, सरकारी प्रवक्त्यांनी ही माहिती दिली आहे.
रस्त्यांवर कोणतेही धार्मिक कार्यक्रम घेण्यास कोणतीही परवानगी देऊ नका. अशा प्रकारचे सर्व कार्यक्रम हे संबंधित धार्मिक स्थळांमध्येच व्हायला हेवत, रस्त्यावर नाही, असे स्पष्ट निर्देश मुख्यमंत्री योगी यांनी पोलीस आणि जिल्हा प्रशासनाला दिले आहेत.



दरम्यान, महाराष्ट्रात मनसेच्या गुढी पाडवा सभेत राज ठाकरे यांनी मशिदींवरील भोंग्यांचा विषय काढत ते उतरवले गेले पाहिजेत अन्यथा त्याच्यासमोर दुप्पट आवाजात हनुमान चालिसा लावण्यात येईल, अशी गर्जना त्यांनी केली होती. याचे पडसाद देशभरात उमटले होते. भाजपनंही राज ठाकरेंच्या भूमिकेला पूर्ण पाठिंबा देत ही मागणी लावून धरली होती. यानंतर लगेचच उत्तर प्रदेशातून बातमी आली की, तिथल्या योगी सरकारनं हिंदु-मुस्लिमांसह सर्वच धार्मिक स्थळांवरील लाखो अनधिकृत भोंगे उतरवले आहेत.
योगींच्या या भोगे उतरवण्याच्या निणऱ्याचं मोठं स्वागत आणि चर्चाही झाली होती. त्यानंतर आता रस्त्यावर धार्मिक कार्यक्रम होता कामा नये अशी भूमिका त्यांनी मांडली असून तसे स्पष्ट निर्देशही संबंधित प्रशासनाला त्यांनी दिले आहेत.

# तुम्ही नैतिकता पाळणार नसाल, तर आम्हीही कोथळा काढू

## शिवसेना नेते संजय राऊत यांची टिका

**मुंबई / प्रतिनिधी**
निवडणुकीत तुम्ही नैतिकता पाळणार नसाल, तर कोथळा काढण्याचा आम्हाला अधिकारच असेल, असे वक्तव्य शिवसेनेचे खासदार संजय राऊत यांनी रविवारी केले. शिवसैनिकांच्या सोशल मीडिया सेलच्या मेळाव्यात ते बोलत होते.
हिटलर ज्या प्रकारचे इव्हेंट करायचा, त्याच प्रकराचे इव्हेंट आता पंतप्रधान नरेंद्र मोदी करीत आहेत, अशी बोचरी टीका त्यांनी केली, राहुल गांधी यांना अपयशाचे धनी करण्यात जर कोणाचा हात असेल, तर तो भाजपच्या सोशल टीमचा, त्यांनी राहुल गांधी यांना सतत पप्पू म्हणून हिणवले. माजी पंतप्रधान मनमोहन सिंग हेमोनी बाबा आहेत, ते निर्णय घेऊ शकत नाहीत, असे जनतेत पसरविले. भाजप हा सर्वात जास्त पैसा आयटी सेलवरच खर्च करतो. शिवसेनेवर टीका करायला तर त्यांनी खास माणसेच ठेवली आहेत, अशी टीकाही राऊत यांनी केली. संजय राऊत म्हणाले, शिवसेनेशिवाय सोशल मीडिया पुढे जाऊ शकत नाही.




आमने

बाळासाहेब आमचा चेहरा होते, त्यावेळी सोशल मीडिया कुठे होती? हिटलर सगळ्यांना प्रिय होता, बाळासाहेबांना देखील आवडायचा. आता पंतप्रधानांनाही हिटलर आवडतो. मोदी हिटलरला फॉलो करतात. ज्या प्रकारचे इव्हेंट हिटलर करायचा, त्याच प्रकारचे इव्हेंट हे आता मोदी करत आहेत.

# वेळ आल्यावर आम्हीच त्यांचा कोथळा बाहेर काढू

## केंद्रीय राज्यमंत्री दानवे यांचा शिवसेनेला इशारा

**जालना / प्रतिनिधी**



सामने

शिवसेनेचे लग्न आमच्याशी ठरले होते; मात्र ते दुसऱ्यांसोबत पळून गेले. स्वतःला मुख्यमंत्री बनवण्यासाठी आम्हाला सोडून दिली. एका मुख्यमंत्रिपदामुळे त्यांचे सर्व आमदार- खासदारही नाराज आहेत. ते काय आमचा कोथळा काढतील; वेळ आल्यावर आम्हीच त्यांचा कोथळा काढू, अशा शब्दांत रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांनी शिवसेनेवर रविवारी हल्लाबोल केला.
इम्पेरिकल डेटाशी केंद्र सरकारचा काहीही संबंध नाही. इम्पेरिकल डेटा द्या, अशी कोणतीही सूचना कोर्टाकडून केंद्राला आलेली नाही, कोर्ट जेव्हा राज्य सरकारकडे इम्पेरिकल डेटा मागते, तेव्हा ती राज्य सरकारची जबाबदारी आहे. विजेचे संकट, कोव्हिडचा काळ, मराठा समाजाचे आरक्षण, धनगर किंवा ओबीसी आरक्षण असू द्या, सर्वच ठिकाणी हे सरकार अपयशी ठरले आहे, असा आरोप त्यांनी केला. हेसरकार ज्या-ज्यावेळी अपयशी ठरले, त्या-त्यावेळी त्यांनी केंद्र सरकारवर खापर फोडले. मंत्रिमंडळात आता जे काही ओबीसी नेते आहेत, ते फक्त शोभेची वस्तू आहेत. त्यांचे सरकारमध्ये काहीच चालत नाही. ओबीसी समाजावर अन्याय करणे हे राज्य सरकारचे धोरणच आहे, अशी टीकाही दानवे यांनी केली.

# आरक्षण मिळेपर्यंत भाजप देणार ओबीसींना २७ टक्के उमेदवारी

## ओबीसी मोर्चाच्या बैठकीत फडणवीस यांची घोषणा

**मुंबई / प्रतिनिधी**
ओबीसी आरक्षण मिळेपर्यंत भाजपचा संघर्ष सुरूच राहणार आहे. तोपर्यंत प्रत्येक निवडणुकीत ओबीसींना २७ टक्के उमेदवारी दिली जाईल, अशी घोषणा विधानसभेतील विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी भाजप ओबीसी मोर्चाच्या कार्यकारिणी बैठकीत केली.
फडणवीस म्हणाले, ओबीसांच्या राजकीय आरक्षणाच्या माध्यमातून समाजातील विविध घटकांना राजकीय प्रतिनिधित्व मिळत होते; पण राज्यातील महाविकास आघाडी सरकारच्या हलगर्जीपणामुळे ओबीसांचे राजकीय आरक्षण संपुष्टात आले आहे. त्यामुळे सर्वसामान्यांच्या आरक्षणावर गदा आणणाऱ्या या सरकारला मतदान करू नका.
राज्यातील महाविकास आघाडीच्या सरकारने विश्वासघाताचे राजकारण केले आहे. त्यांना ओबीसींना आरक्षण द्यायचेच नव्हते. आपली इच्छा त्यांनी पूर्ण केली आहे. जोपर्यंत ओबीसींना आरक्षण मिळत नाही, तोपर्वंत आमचा लढा सुरूच राहील, असे पप्पा प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील म्हणाले,
सर्वोच्च न्यायालयाने राज्यसरकारला ओबीसी राजकीय आरक्षणासाठी तिहेरी चाचणी पूर्ण करण्यास सांगितले आहे. त्याला दोन वर्षे पूर्ण झाली; पण या सरकारने काही केलेले नाही. त्यामुळे आता २२ महानगरपालिका, सुमारे ३०० नगरपालिका, २५ जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांच्या निवडणुका ओबीसी आरक्षणाशिवाय होण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे.



आमने

भाजपमधील ओबीसी नेते आपल्या कर्तृत्वाने मोठे होत आहेत. त्यामुळे मुख्यमंत्र्यांसह अनेक मंत्र्यांना पोटदुखी होती. त्यामुळेच ओबीसींना आरक्षण मिळणार नाही, असाच प्रयत्न त्यांच्याकडून झाला. मुख्यमंत्र्यांनी विरोधी नेत्यांवर टीका करताना जो आक्रमकपणा दाखवला आहे, तोच आक्रमकपणा विकासकामांच्या बाबतीतही दाखवावा, असे आव्हानही पाटील यांनी दिले.

# ओबीसींबद्दलचा भाजपचा कळवळा हा फक्त देखावाच!

## काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांचा आरोप

**मुंबई / प्रतिनिधी**
ओबीसांच्या राजकीय आरक्षणावर भाजपला आलेला कळवळा हा निव्वळ देखावा आहे. या पक्षाचा डीएनए ओबीसी नसून, ओबीसीविरोधी आहे, अशी टीका काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी शनिवारी केली.



सामने

पटोले म्हणाले, देशातील आरक्षण संपवणे हा राष्ट्रीय स्वयंसेवक संघ व भारतीय जनता पक्षाचा अजेंडा आहे. ओबीसींच्या राजकीय आरक्षणाचा पेच तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणबीस यांच्यामुळे निर्माण झाला आहे. भाजपचे सरकार असताना २०१७ मध्ये नागपूर जिल्हा परिषद निवडणुकीवेळी फडणवीस यांनी ओबीसांचे रोशटर क्लीअर करायचे म्हणून एक साधे परिपत्रक काढले आणि जिल्हा परिषद निवडणुका पुढे ढकलल्या. हे प्रकरण न्यायालयात गेले. त्यानंतर भंडारा जिल्हा परिषदेसह इतर जिल्हा परिषदाही न्यायालयात गेल्या. २०१८ मध्ये उच्च न्यायालयाने आयोग स्थापन करण्याचे आदेश दिले. मात्र, फडणवीस सरकारने त्यावर निर्णय घेतला नाही, त्यामुळेच ओबीसींचे आरक्षण गेले, असा आरोप पटोले यांनी केला. ओबीसी आरक्षणासाठी आवश्यक असणारा डेटा देण्यास केंद्रातील मोदी सरकारने नकार देऊन महाराष्ट्र सरकारची कोंडी केली. मध्य प्रदेशमध्ये जेव्हा ओबीसी आरक्षणाचा प्रश्न उपस्थित झाला, तेव्हा मात्र मोदी सरकारने त्यांना मदत करण्याची भूमिका घेतली. महाराष्ट्रात भाजपविरोधी सरकार असल्याने केंद्राने मदत केली नाही, असा आरोप पटोले यांनी केला.
देवेंद्र फडणवीस ब भारतीय जनता पक्ष ओबीसी आरक्षणाच्या आजच्या परिस्थितीचे खापर महाविकास आघाडी सरकारवर फोडत आहेत. दोन वर्षे काय केले, असा प्रश्न विचारत आहेत; मग फडणवीस सरकारने पाच वर्षे काय केले, त्यांनी आयोग का स्थापन केला नाही, असा सवालही पटोले यांनी भाजप नेत्यांना केला.

# अल्टिमेटम देण्याचा तुम्हाला अधिकार काय?

## अजित पवार यांनी राज ठाकरे यांना सुनावले

**सातारा / प्रतिनिधी**
कुणीही कुणाला अल्टिमेटम देण्याच्या भानगडीत पडू नये. संविधानातील कायदे व नियमाला धरूनच सरकार चालत असते. तुम्हाला अल्टिमेटम देण्याचा अधिकार काय?, अशा शब्दांत



उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मनसे नेते राज ठाकरे यांना सुनावले.
भोंग्याबाबत राज ठाकरे यांनी सरकारला अल्टिमेटम दिला आहे. याबाबत विचारले असता पवार यांनी हे उत्तर दिले. येथील शासकीय विश्रामगृहावर झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते.
कायदा हातात. घेण्याचा कुणालाच अधिकार नाही. कायदा सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी 'पोलिस त्यांचे काम करतील. यापूर्वी काहींनी पोलिसांबद्दल चुकीचे स्टेटमेंट करत त्यांना बदनाम करण्याचा प्रयत्न केला. मात्र पोलिस कायद्यानुसारच बागल्याचे पवार यांनी सांगितले.
कारखान्यांचे हंगाम संपत आले असले तरी नजीकचा ऊस तुटावा यासाठी रिकव्हरी लॉस ब वाहतुकीचे अनुदान सरकारकडून दिले जात असून ऊस उत्पादकांचा तोटा होणार आहे याची काळजी सरकार घेत असल्याची ग्वाहीही पवार यांनी दिली.
ते. म्हणाले, शेतकऱ्यांचे नुकसान होऊ नये यासाठी इतर कारखान्यांकडून या उसाचे गाळप करावे यासाठी वाहतूक अनुदान आणि रिकव्हरी लॉस दिला आहे. सरकारकडून अनुदान शेतकऱ्याला दिले जात आहे. शेतकऱ्याला चांगला दर मिळाला पाहिजे.

# इम्रान खान म्हणाले, 'मैं गधा हूँ'!

## व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल, युझर्सकडून ट्रोल

**इस्लामाबाद / वृत्तसंस्था**
पाकिस्तानचे माजी पंतप्रधान इम्रान खान पुन्हा एकदा सोशल मीडियावर चर्चेत आले आहेत. त्यांनी आपली तुलना गाढवाशी केल्याने ते सोशल मीडियावर ट्रोल झाले आहेत. (मैं गधा हूं!) व्हायरल झालेल्या व्हिडीओमध्ये इम्रान खान यांनी ब्रिटनमधील आठवणींना उजाळा दिला आहे.
ते म्हणतात की, कधी काळी मी ब्रिटिश समाजाचा घटक होतो; मात्र ते मी कधीच स्वीकारले नाही. ब्रिटिश लोक माझे नेहमीच आदराने स्वागत करत असत. तरीही त्यांना मी आपले कधीच मानले नाही. कारण मी पाकिस्तानी आहे. मी कधीच इंग्रज होऊ शकत नाही. कारण ङगाढव' कधीच 'झेत्रा' होऊ शकत नाही, कारण गाढव हा गाढवच असतो. त्यांचा हा व्हिडीओ सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल झाला आहे. त्यांना अनेक युजर्सनी ट्रोल केले आहे. इम्रान खान पहिल्यांदा खरे बोलत असल्याचा एक युजर म्हणाला तर इम्रान खान यांनी आपले सत्य कबूल केल्याचे दुसऱ्या एका युजरने म्हटले आहे.
दरम्यान, पाकिस्तानात व्हिडीओ वॉर छेडले आहे. आता इम्रान खान यांचे आणखी ७ते ८ व्हिडीओ लिक होण्याची शक्यता आहे. काही व्हिडीओ लिक झाले असल्याचे त्यांनी मान्य केले आहे, मात्र हा विरोधांचा कुटिल डाव असल्याचे इम्रान खान यांनी दावा केला आहे. इम्रान खान यांचे व्हिडीओ लिक करू नका, अशी माझी विनंती आहे. यामुळे पाकिस्तानात मोठे अराजक निर्माण होण्याची शक्यता असल्याचे इम्रान खान यांचे मुख्य सल्लागार शहबाज गिल यांनी म्हटले आहे.

**यापूर्वीही वादग्रस्त वक्तव्ये**
यापूर्वी इम्रान खान यांनी अनेक वादग्रस्त वक्तव्ये केली आहेत. त्यांनी ओसामा बिन लादेनला शहीद म्हटले होते. त्यानंतर त्यांना टीकेला सामोरे जावे लागले होते. इम्रान खान यांनी बलात्कारांच्या घटनांबाबतही वादग्रस्त विधान केले होते. तसेच पाकिस्तान पीपल्स पार्टीचे बिलावल भुट्टो-झरदारी यांना 'बिलावल साहिबा' म्हणून संबोधले होते.



### आदित्य ठाकरे येत्या १० जूनला अयोध्येत जाणार

**मुंबई / प्रतिनिधी**
शिवसेना नेते आणि राज्याचे पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे १० जूनला अयोध्येत प्रभू श्रीरामाच्या दर्शनासाठी जाणार आहेत. मनसे अध्यक्ष राज ठाकरे ५ जूनला अयोध्येला जातील. या निमित्ताने पुन्हा एकदा शिवसेना विरुद्ध मनसे, असा राजकीय संघर्ष बघायला मिळेल.
शिवसेनेचे मुख्य प्रवक्ते खासदार संजय राऊत यांनी रविवारी पत्रकारांना सांगितले की, आदित्य यांच्या १० महाराष्ट्रातील तसेच उत्तर प्रदेशमधील शिवसेनेचे अनेक नेते, कार्यकर्ते त्यांच्यासोबत असतील, दौऱ्याची तयारी सुरू झाली आहे. जूनच्या अयोध्या दौऱ्यात स्वता आदित्य यांनी मात्र दौऱ्याची तारीख जाहीर केली नाही. १४ मे रोजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांची सभा मुंबईत होणार आहे.

# उध्दव ठाकरेंनी माझ्याविरूद्ध निवडणूक लढवून दाखवावी

## रूग्णालयात डिस्चार्ज घेताच खा. नवीन राणा यांचे आवाहन

**मुंबई / प्रतिनिर्धी**
लीलावती रुग्णालयातून रविवारी डिस्चार्ज मिळताच खासदार नवनीत राणा यांनी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना आपल्याविरुद्ध निवडणूक लढवण्याचे आव्हान दिले. तुमच्यात दम असेल; तर लोकांमधून निवडून येऊन दाखवा. उद्धव ठाकरे हे महाराष्ट्रातील ज्या मतदारसंघात उभे राहतील तिथून मी उभी राहून जिंकून दाखवेन, तेव्हा त्यांना जनतेची ताकद काय असते हे कळेल, असे त्या पत्रकारांशी बोलताना म्हणाल्या.
दोन पिढ्यांपासून मुंबई महानगरपालिका शिवसेनेकडे आहे. मात्र, येणाऱ्या निवडणुकीत मुंबईची जनता आणि राम भक्त त्यांना त्यांची जागा दाखवून देतील. मी मुंबईची मुलगी आहे. मुंबईला न्याय देण्यासाठी आपण पूर्ण ताकदीने मुंबई पालिका निवडणुकीत उतरू आणि शिवसेनेविरुद्ध प्रचार करू, असेही त्यांनी जाहीर केले. हनुमान चालिसाचे पठण करणे गुन्हा असेल; तर मी १४ दिवस नाही, तर १४ वर्षेही तुरुंगात राहण्यास तयार असल्याचे नवनीत राणा यांनी सांगितले.
मागील २ वर्षांत 'महाबीज'च्या माध्यमातून शेतकऱ्यांना ९० टक्के बोगस बियाणे देण्यात आले; तरीही 'महाबीज'वर कोणतीही कारबाई केलेली नाही, असा आरोप राणा यांनी केला. महाराष्ट्रात नवे उद्योग आले पाहिजेत; पण मोठ्या प्रमाणात वीज भारनियमन आहे. त्यामुळे औद्योगिक विकास थांबला आहे, असे ते म्हणाले. मुख्यमंत्र्यांनी आता बाहेर पडून जिल्ह्या जिल्ह्यांत फिरले पाहिजे. त्यांनी त्यांची ऑनलाईन शाळा बंद करावी, असा टोला राणा यांनी लगावला.

**राणांकडून अटींचा भंग**
**खासदार नबनीत राणा यांना जामीन मंजूर करताना न्यायालयाने त्यांना घातलेल्या अटी, शतींचे त्यांच्याकडून उल्लंघन झाले आहे. त्यामुळे त्या पुन्हा एकदा अडचणीत आल्या आहेत. सरकारी बकील प्रदीप घरत यांनी राणा यांचा जामीन रद्द होण्यासाठी न्यायालयात जाणार असल्याचे रविवारी सांगितले. नवनीत आणि रवी राणा यांना जामीन मंजूर करताना न्यायालयाने माध्यमांशी बोलू नये, आरोप करू नये अशा अटी घातल्या होत्या.**

# झाडे कुटुंबियांच्या मदतीला धावून आले 'देव'राव

## अपघातात मृतपावलेल्या टँकर चालकाच्या कुटुंबियांना मिळवून दिली ५ लाखाची मदत, कर्नाटक एम्टा येथील घटना



- रात्रीचे १० वाजून गेले पण प्रशासनाला जाग येईना म्हणून देवराव भोंगळे यांनी आकाश वानखडे भाजयुमो जिल्हा उपाध्यक्ष यांना आदेश देवून खान बंद करण्यास सांगितले. त्या नंतर वानखडे व अक्षय नागपुरे यांच्या नेतृत्वात १०० ते १५० युवा कार्यकर्त्यांना सोबत घेवून रात्रो १० वाजता पासून सकाळी ५ वाजे पर्यंत खान बंद करण्यात आली होती.
- यावेळी खाणीचे उत्पादन व उत्खनन पूर्ण ठप्प झाले होते. आंदोलकांना अडविण्यासाठी घटनास्थळी पोलिसांचा ताफा तैनात करण्यात आला होता.त्यांना न जुमानता खान बंद पाडली.त्यानंतर झोपलेले कंपनी प्रशासन जागे झाले व मृतकाच्या कुटुंबियाला ५ लाख रुपयाची मदत देण्यात आली.
- त्यांनतर ०५ मे ला सकाळी ५. वाजता आंदोलन समाप्त करण्यात आले. देवराव भोंगळे यांनी दाखवलेली समयसूचकता व त्या गरीब कुटुंबियाला मिळवून दिलेली मदत यामुळे. झाडे कुटुंबियांच्या मदतीला धावून आला 'देव' राव असे वयोवृद्ध म्हणतांना दिसत होते.

**चंद्रपूर / प्रतिनिधी**
भद्रावती तालुक्यातील कर्नाटक एम्टा परिसरात टँकर पलटून चालकाचा मृत्यू झाल्याची घटना ४ मे रोज बुधवारला सकाळी ८ वाजताच्या दरम्यान घडली. कर्नाटक एम्टा कोळसा खदान मधून होणाऱ्या कोळशाच्या वाहतुकीमुळे रोडवर धूळ निर्माण होते. प्रदूषण होऊ नये व इतर वाहनचालकांना त्रास होऊ नये म्हणून टँकरने पाणी मारण्याचे कंत्राट येथील राजू ढेंगळे यांना मिळाले. त्यांचे टँकरवर खुशब झाडे ३९ (हल्ली मुक्काम कोंढा) हे चालक म्हणून कार्यरत होते. ०४ मे बुधवारला नेहमी प्रमाणे टँकर भरून रोड वर पाणी मारत असताना चालकाचे गाडी वरील नियंत्रण सुटले आणि टँकर रोड खाली उतरवून पलटी झाले यात चालक दबल्या गेला व त्याचा मृत्यू झाला. घटनेची माहिती होताच परिसरात गर्दी गोळा झाली होती. पोलिसांना घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळ गाठत मृतकाला ग्रामीण रुग्णालय भद्रावती येथे हलविण्यात आहे. तिथे डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. अपघात ड्युटीवर झाल्याने मोबदल्याची मागणी जोर धरू लागली. जो पर्यंत मृतकाच्या कुटुंबियांना मदत मिळत नाही तो पर्यंत शवविच्छेदन होऊ देणार नाही असा निर्णय आप्तेष्टांनी घेतल्याने परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. मृतक हा मुख्य राहणार पोंभुर्णा तालुक्यातील असल्याने पोंभुर्णा पंचायत समितीचे माजी उपसभापती विनोद देशमुख हे हि कुटुंबियांचे सांत्वन करण्यासाठी तिथे हजर झाले. अनेकांनी कंपनी प्रशासनाला मदतीची मागणी करुन हि कुठलाच प्रतिसाद कंपनी प्रशासनाकडून कडून न मिळाल्याने विनोद देशमुख यांनी भाजपचे स्थानिक पदाधिकारी युवामोर्चाचे जिल्हाउपाध्यक्ष आकाश वानखडे व भाजपचे जिल्हाध्यक्ष देवराव भोंगळे यांना कैफियत सांगताच घटनेचे गांभीर्य लक्षात घेता क्षणाचाही विलंब न करता आकाश वानखडे यांनी रुग्णालय गाठले. काही वेळात झाडे कुटुंबियांच्या मदतीसाठी देवराव भोंगळे, महामंत्री नरेंद्र जिवतोडे, माजपा युवा मोर्चा राज्य उपाध्यक्ष विवेक बोढे अक्षय नागपुरे हे दाखल झाले. कंपनी प्रशासनासोबत चर्चा करून कंपनी प्रशासन न मानल्याने व कुठलाही तोडगा न निघाल्याने सायंकाळी ८ वाजता पासून जिल्हाध्यक्ष देवराव भोंगळे महामंत्री नरेंद्र जिवतोडे, विवेक बोढे, अक्षय नागपुरे यांच्या नेतृत्वात कंपनीची वाहतूक रोखण्यात आली.
यावेळी नरेंद्र जिवतोडे, हरी सूर, राकेश बोमनवार, विवेक बोढे, आकाश वानखडे .अक्षय नागपुरे, विस्मय बहादे, सोमेश्वर आत्राम, स्वप्नील पिदुरकर, गणेश परचाके, पांडुरंग निब्रड, मंगेश मांगम, नितेश बानोत, गजू पाल, शेखर नागपुरे, वैभव नागपुरे, राहुल नागपुरे, राहुल निब्रड, साजन काळे, अतिश डोंगरे, प्रणय गोंडे, अभिजित भुसारी, दिनेश नागपुरे, मनोज नागपुरे, अमित पोतराजे, संतोष गोंडे, संजय नागपुरे, चैनाथ काकडे, अरविंद डोंगे, मंगेश पाल, गौरव गोंडे, सुजित डोंगे, आनंद थेरे, निखिल पिंगे, यश गोलाईत तसेच गावातील नागरिक उपस्थित होते

# पत्रकारांना पाहताच आरटीओची धूम

## रामपूर-सास्ती टी-पॉईटवर वरील घटना; अनेक जड वाहन उभे असताना काढला पाय




एरव्ही छोट्या छोट्या कारणास्थव आडमार्गाने जाऊन वाहन चालकांकडून दंडाची रक्कम वसूल करणारे उपप्रादेशिक परिवहन अधिकारी ट्रान्सपोर्ट मालकांच्या ट्रका क्षमतेपेक्षा जास्त वजन वाहतूक करीत असल्याची माहिती पत्रकारांनी दिल्यानंतर छुप्या मार्गाने पळ काढण्याचे करण काय असा प्रश्न निर्माण होत आहे.

**राजुरा / प्रतिनिधी**
प्रादेशिक परिवहन अधिकारी म्हणजे आरटीओ यांची सर्व सामान्य नागरिकांमध्ये वेगळी ओळख, वाहनासमोर आले की मनात धास्ती शिरत असून वाहन चालवीत असताना काही नियमांचे उल्लंघने होत असल्यामुळे दंडाची पावती चालकाच्या हातात मिळणार हे निश्चित. मात्र रस्त्यावर उभे असलेले क्षमतेपेक्षा जास्त जड वाहतूक करणारे अनेक ट्रक असताना चंद्रपूर प्रादेशिक परिवहन अधिकारी कारवाही न करता पळून वरिष्ठ अधिकाऱ्यांना सोबत आणणार असल्याचा बहाणा करीत पळ काढल्याने त्या ठिकाणी उपस्थित नागरिकांनी त्या अधिकाऱ्याच्या कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे.
प्राप्त माहितीनुसार राजुरा-रामपूर-गोवरी रस्त्याचे बांधकाम मागील अनेक महिन्यापासून संथ गतीने सुरु आहे. या मार्गावरून सुरू असलेली जड वाहतूक व यामुळे रस्त्यावरून उडणाऱ्या धुळीच्या त्रासाला कंटाळून स्थानिक नागरिकांनी सरपंच वंदना गौरकर यांच्या नेतृत्वात सायंकाळी पाच वाजता रामपूर बस स्थानक जवळील परिसरात रस्त्यावरुन सुरू असलेली जड वाहतूक रोखली होती. यावेळी रस्त्याच्या दुतर्फा ट्रकांच्या रांगा लागलेल्या होत्या. याठिकाणी वृत्त संकलन करण्यासाठी येणाऱ्या पत्रकारांना सास्ती-रामपूर टी-पॉईंटवर उपप्रादेशिक परिवहन अधिकाऱ्याचे वाहन उभे असताना दिसले. यावेळी या वाहनाचे चालक लगतच्या एका कोळसा भरून असलेल्या ट्रकमध्ये चढून वाहनाचे कागदपत्र पाहत होते मात्र ट्रक चालक नसल्याने यांना काहीच मिळाले नाही. वाहन चालकाच्या सांगण्यानुसार त्या वाहनात बसून असलेले हटवार उपप्रादेशिक परिवहन अधिकारी यांना पत्रकारांनी याच मार्गावर शंभर मीटर अंतरावर क्षमतेपेक्षा जास्त वजन कोळसा भरून उभ्या असलेल्या ट्रकांच्या कागदपत्रांची पाहणी करण्यासंबंधी माहिती दिली मात्र संबंधित अधिकारी आमचे वरिष्ठ अधिकारी समोर उभे असून त्यांना घेऊन येतो म्हणून पळून गेले. यामुळे त्या ठिकाणी असलेल्या अनेक नागरिकांना उपप्रादेशिक परिवहन अधिकाऱ्याचा हा संशयास्पद खेळ प्रत्यक्ष पाहायला मिळला असून या प्रकाराबद्दल उपस्थित नागरिक रोष व्यक्त करीत असून जड वाहतुकीला याच अधिकाऱ्यांचा पाठींबा असल्याचे यातून सिद्ध होत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

# खिर्डी आदिवासी सोसायटीवर काँग्रेसचे १३ पैकी ११ उमेदवार बिनविरोध

**कोरपना / प्रतिनिधी**
तालुक्यातील खिर्डी आदिवासी सोसायटीवर काँग्रेसचे १३ पैकी ११ उमेदवार बिनविरोध निवडून आले आहे.



आमदार सुभाष धोटे व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक शेखर धोटे यांच्या नेतृत्वात ही निवडणूक लढविण्यात आली होती. काँग्रेस विरुद्ध शेतकरी संघटना अशी लढत होणार होती. मात्र काँग्रेसच्या ६ उमेदवारांच्या विरोधात विरोधकांचा अर्ज नसल्याने ६ उमेदवारांची पूर्वीच अविरोध निवड झाली. उर्वरित ७ जागांसाठी काँग्रेस व शेतकरी संघटनेने विविध गटातून नामांकन अर्ज भरले.
५ मे ला नामनिर्देशन वापस घेण्याची तारीख होती. शेतकरी संघटनेने ५ तर काँग्रेसने २ अर्ज मागे घेतल्याने निवडणूक अविरोध पार पडली. बिनविरोध निवडून आलेल्या सदस्यांमध्ये काँग्रेसचे रामचंद्र कुळमेथे, राजेंद्र मडावी, पद्माकर मडावी, भीमा सिडाम, बापूजी सलाम, अशोक आस्कर, सुरेश राऊत, कमलाकर देरकर, गुलाब जीवतोडे, मंगला पंधरे, मंगल येरमे तर शेतकरी संघटनेचे सुभाष कोडापे, उद्धव लिपटे यांचा समावेश आहे.

# विवेकानंद महाविद्यालयात नेट-सेट परीक्षा मार्गदर्शन कार्यशाळा

**भद्रावती / प्रतिनिधी**
स्थानिक विवेकानंद महाविद्यालयातील इतिहास विषयात मास्टर डिग्रीचे शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना विद्यापीठ आणि महाविद्यालयात सहाय्यक प्राध्यापक होण्यासाठी आवश्यक असलेली पात्रता म्हणजे नेट आणि सेट या परीक्षेची बारीक-सारीक अशी इतंभुत माहिती होऊन सदर परीक्षेविषयी विद्यार्थ्यांच्या मनात गोडी आणि रुची निमाण होऊन ही परीक्षा उत्तीर्ण करण्यासाठी नेमकी आणि नियोजनबद्ध तयारी कशी करावी? जेणेकरून ही पात्रता परीक्षा उत्तीर्ण होण्यास, विद्यार्थ्यांचा मार्ग अधिक सोपा आणि सुकर व्हावा हा उद्देश ठेवून सदर महाविद्यालयाच्या इतिहास विभागातर्फे नेट-सेट परीक्षा विषयी मार्गदर्शन कार्यशाळेचे



आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी विदर्भ कॉलेज ऑफ आर्ट, कॉमर्स अँड सायन्स, जिवती या महाविद्यालयातील इतिहास विभागप्रमुख डॉ. श्रीकांत पानघाटे यांनी या कार्यशाळेचे प्रमुख मार्गदर्शक या नात्याने उपस्थित विद्यार्थ्यांसमक्ष या परीक्षेचे स्वरूप आणि अभ्यासक्रम यावर सविस्तरपणे प्रकाश टाकला. सोबतच त्यांनी नेट आणि सेट या परीक्षेतील विविध बाबींवर सखोल भाष्य केले. ते त्यांच्या मार्गदर्शनपर व्याख्यानात म्हणाले की, 'नियोजन, निर्धार, निश्चय, सातत्य शिस्त, स्वारस्य आणि परिश्रम या बाबींचा योग्य समन्वय साधून नेट आणि सेट परीक्षेची पद्धतशीर तयारी केली तर नेट-सेट ही महत्त्वपूर्ण परीक्षा उत्तीर्ण होण्यास विद्यार्थ्यांना फारसे कठीण जाणार नाही'.
या कार्यशाळेत इतिहासाच्या विद्यार्थ्यांनी आपल्या मनात असणाऱ्या शंका आणि प्रश्न मुख्य मार्गदर्शक यांच्यापुढे अभिव्यक्त केल्या. या अनुषंगाने सर्व विद्यार्थ्यांच्या प्रश्नांचे निरसन डॉ. श्रीकांत पानघाटे यांच्याकडून विस्तृतपणे करण्यात आले. या कार्यशाळेचे अध्यक्षीय भाषण करताना इंग्रजी विभागप्रमुख प्रा. मोहित सावे यांनी, ' या कार्यशाळेतील मार्गदर्शनाचा लाभ घेऊन इथे उपस्थित असणारा इतिहासाचा विद्यार्थी हा येणाऱ्या काळात नक्कीच नेट-सेट परीक्षा उत्तीर्ण करेल' असा आशावाद व्यक्त केला. या कार्यशाळेचे संचालन इतिहास विभागप्रमुख प्रा. डॉ. जयवंत काकडे, आभारप्रदर्शन डॉ.यशवंत घुमे यांनी केले.
या कार्यक्रमाला विद्यार्थ्यांचा उस्फूर्त प्रतिसाद लाभला.

# भद्रावती शहरात निशुल्क 'बौद्ध धम्म संस्कार वर्ग' पुनश्च एकदा नव्याने सुरु

**भद्रावती / प्रतिनिधी**
बौद्ध संस्कृतीसाठी एतिहासीक धरोहर म्हणुन ओळखल्या जाते. मागील २०१७ पासुन समता सैनिक दला मार्फत भद्रावती परीसरात बौद्ध धम्म संस्कार वर्ग राबविण्यात येत होते. मात्र कोविड मुळे संस्कार वर्गामध्ये खंड पडत गेला. आता पुन्हा जनते मध्ये बौद्ध संस्कार रुजावेत या अनुषंगाने पुनश्च एकदा नव्या जोमाने समता सैनिक दल शाखा भद्रावती तसेच विविध संस्थाना सोबत घेउन निशुल्क संस्कार वर्ग सुरु करण्यात आला आहे.
संस्कार वर्गाचा उद्घाटन कार्यक्रम रविवार दि.०८ मे २०२२ सकाळी ८:३० वाजता भद्रावती येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर हाईस्कुल भद्रावती




येथे पार पडला. कार्यक्रमाचे अध्यक्ष अविनाश दिग्विजय संघटक महाराष्ट्र राज्य समता सैनिक दल होते. उद्घाटक मुख्याध्यापक मिलिंद वाघमारे यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. तसेच ॲड.राजरत्न पथाडे प्रमुख अतिथी म्हणुन उपस्थीती होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक समता सैनिक दलाचे तालुका संघटक हर्षल रामटेके यांनी केले. तर आभार मनीकुमार जाधव सर शहर संघटक यांनी केले. तसेच उद्घाटकीय कार्यक्रमाचे सुत्रसंचलन गणेश शिरुड सर ह्यांनी केले.
नैतिकताच धम्म आहे बौद्ध संस्कृतीचा वारसा जोपासण्यासाठी तसेच व्यक्तिमत्व विकास, कॅरियर गायडन्स, विविध स्पर्धा, अभ्यासाची आवड, नैतिकता, वैज्ञानिक दृष्टिकोन, कलागुणांची जोपासना आणि त्यांचा विकास, या व अशा अनेक विषयाला घेऊन वर्तमान व भविष्यातील आवाहनाला पेलुन धरण्यासाठी मुला-मुलींनी आणि समस्त जनतेनी निरंतर चालणा-या या बौद्ध धम्म संस्कार वर्गामधे येण्याचे आवाहन यावेळी मंचावर उपस्थित पाहुण्यांद्वारे करण्यात आले.

# भद्रावती येथे श्रीगुरुदेव सर्वांगीण सुसंस्कार शिबिर

**भद्रावती / प्रतिनिधी**
भारतीय संस्कृतीमधील महानतम विचार मुल्ये आजच्या पिढीमध्ये रूजवुन बाल-तरुणांची मने सुसंस्कार युक्त घडावी व धर्म, समाज तसेच राष्ट्रकार्यात त्यांची योगदानाची भूमिका लक्षात घेता भद्रावती येथे श्रीगुरुदेव सर्वांगीण सुसंस्कार शिबिर समिती भद्रावतीचे वतीने भक्त निवास गणेश मंदिर गवराळा येथे श्रीगुरुदेव सर्वांगीण सुसंस्कार शिबिर संपन्न झाले.
या शिबिरात १०० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी प्रवेश घेत या संस्कार यज्ञातून सुसंस्काराचे धडे घेतले. दहा दिवस चाललेल्या अनिवासी शिबिराची सुरुवात दररोज पहाटे ५.३० वाजता सामुदायिक ध्यानाने होऊन यानंतर सूर्यदर्शन, योगासने, मल्लखांब, कराटे, लाठीकाठी, बौद्धिक तासिका, संगीत वर्ग, गटचर्चा, टाळ - पदन्यास, ओळख सुंदर जीवनाची तसेच सामुदायिक प्रार्थनेने शेवट होऊन पुढील




दिनचर्येकरीता विद्यार्थ्यांना स्वगृही पाठविल्या जात असे. वंदनीय राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराजांनी सांगितलेले ग्रामगीतोक्त जीवन शिक्षण विद्यार्थ्यांना देत त्यांच्या माध्यमातून संपूर्ण कुटुंबापर्यंतच राष्ट्रसंताचा विचार पोहचविण्याचा यशस्वी प्रयत्न या शिबिराच्या माध्यमातून झाला हीच शिबिराची फलश्रुती ठरली.
१० दिवस चाललेल्या या अनिवासी शिबिराच्या समारोपीय कार्यक्रमाची सुरुवात गुरुदेव हमारा प्यारा या संकल्प गीताने होऊन अनेक विद्यार्थ्यांनी शिबिरात दिलेल्या प्रशिक्षणाचे कार्यक्रम प्रसंगी प्रात्यक्षिके सादर केली. यात प्रामुख्याने भजन, श्लोक, श्रीमद् भागवतगीता संथा, योगासने, लाठीकाठी, कराटे, मल्लखांब, पदन्यास तसेच शिबिरा विषयी आपले मनोगत विद्यार्थ्यांना प्रसंगी व्यक्त केले. श्री गुरुदेव राष्ट्रधर्म प्रचार समिती, दास टेकडी मोझरी चे संचालक तसेच श्री गुरुदेव सर्वांगीण सुसंस्कार शिबिराचे प्रणेते आचार्य हरी वेरुळकर गुरुजींच्या प्रमुख उपस्थितीत पार पडलेल्या समारोपीय कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शालिक दानव सर तर प्रमुख पाहुणे म्हणून केशवानंद मेश्राम, चंद्रकांत गुंडावार, प्रवीण आडेकर व रेखा कुटेमाटे उपस्थित होत्या.
कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिबीर प्रमुख गुणवंत कुत्तरमारे व मनोज महाराज चौबे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे संचालन विवेक महाकाळकर व आभार प्रदर्शन विशाल गावंडे यांनी केले
कार्यक्रमाप्रसंगी श्रीगुरुदेव सर्वांगीण सुसंस्कार शिबिराच्या स्थायी निधी योजनेत शहरातील एका दानशूर व्यक्तीनी गुप्तदान दाना द्वारे ५१,१११ रुपयाचा निधी तसेच गजानन डंभारे, गजानन ढेंगळे, विवेक महाकाळकर, केशवानंद मेश्राम, उल्हासजी भास्करवार यांनी १० हजार रुपयाचे धनादेश समितीकडे सुपूर्द केले.
दररोज पहाटे ५.३० वाजता होणाऱ्या सामुदायिक ध्यान व सायंकाळी ६.३० वाजता होणाऱ्या सामुदायिक प्रार्थनेप्रसंगी संपूर्ण विद्यार्थ्यांसह त्यांच्या पालकांची उपस्थिती शिबीराचे विशेष आकर्षण ठरले.
कार्यक्रमाच्या यशस्वितेकरिता मधुकरराव बांदुरकर, मुरलीधर मेश्राम, बाबाराव तेलरांधे, झनक चौधरी, रविश मुरकुटे, क्षितिज शिवरकर, पुरुषोत्तम देठे, बालाजी नागपुरे, नरेंद्र मेश्राम, विनोद रासेकर, भुजंगराव खानोरकर, कालिदास चेडे, अशोक गौरकर, नितीन खैरकार, राजू पोलोजवार, बाबाराव नागोसे, किरण रणदिवे, ओमप्रकाश पांडे, शोभाताई खडसे, सुवर्णा पिंपळकर, उर्मिला बोंडे, आशा शेंडे, मनोरमा ढेंगळे, तेजस्विनी डंभारे, सुषमा महाकाळकर, समृद्धी खैरकर, मंदाताई उपगन्लावार, जिजाबाई धाबेकर, मंदा पोईनकर, माला आसुटकर, जिजाबाई देठे तसेच गुरुदेव सेवा मंडळाचे कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

# खत, बियाण्यांची बेभाव विक्री केल्यास कारवाई

## कृषी विभागाच्या बैठकीत कृषी केद्रांना ताकीत

**चंद्रपूर / प्रतिनिधी**
खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर कृषीकेंद्र चालक जादा भावाने खते, बियाणे, कीटकनाशकांची विक्री करतात. दुकानबाहेर दरफलक लावत नाही. उगवण प्रमाणपत्र नसलेल्या खते, बियाण्यांची विक्री करतात. हे प्रकार थांबविण्यासाठी जिल्हा परिषदेच्या कृषी विभागाची तालुकास्तरीय कृषी केंद्र चालकांची बैठक पंचायत समीती येथे घेण्यात आली.
या बैठकीत आवश्यक त्या सूचना केल्यात. जादा दराने खते, बियाणे, कीटकनाशकांची विक्री केल्यास परवाने निलंबित करण्यात येईल, अशी ताकीद दिली. खरीप हंगामाला आता सुरुवात होत आहे. हंगामासाठी कृषी विभागाने तयारी सुरू केली आहे.तालुकास्तरावरील कृषी केंद्रचालकांची बैठक घेणे सुरू केले आहे. याप्रसंगी जिल्हा परिषदेचे प्रभारी कृषी विकास अधिकारी लक्ष्मीनारायण दोडके, उपविभागीय कृषी अधिकारी चंद्रकांत ठाकरे, जिल्हा गुण




नियंत्रण प्रशांत मडावी, मोहीम अधिकारी सुशांत गाडेवार, बीडीओ श्रीकांत बोबडे, तालुका कृषी अधिकारी मोहीनी जाधव, कृषी केंद्र संघटनेचे अध्यक्ष श्रीकांत पिसे किशोर दिवसे यांची उपस्थिती होती. याप्रसंगी कृषी केंद्र चालकांना खताचा साठा, स्टॉक, दराप्रमाणे खते, बियाणे, कीटकनाशकांची विक्री करू नये. एमआरपीप्रमाणे विक्री करावी. जादा दर, अनियंत्रित विक्री, उगवण प्रमाणपत्र नसलेले बियाणे, खत, कीटकनाशकांची विक्री केल्यास परवाने निलंबित करण्यात येतील, अशी ताकीद प्रभारी कृषी विकास अधिकारी लक्ष्मीनारायण दोडके यांनी दिली. सोयाबीन, कापसाची उगवणक्षमता तपासूनच विक्री करावी. उगवण क्षमता तपासल्यानंतरच पेरणी करण्याचा सल्ला त्यांनी शेतकऱ्यांना दिला. यावेळी अशोक पोटे, प्रभाकर चाफले, रवींन्द्र ढूमने, राहूल पिदूरकर, देवा बझारे, इत्यादी कृषी केंद संचालक उपस्थीत होते.

**सह्याद्री चा राखणदार** साप्ताहिक वृत्तपत्र मालक, प्रकाशक, **संपादक आशीष मारोती घुमे** यांनी **मुद्रक सुरज भक्तराज घुमे** सहयाद्री मल्टिसर्व्हिसेस कर्मवीर वॉर्ड वरोरा येथून मुद्रित करून मातृछायाभवन कर्मवीर वॉर्ड वरोरा येथून प्रकाशित केले आहे. यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही. यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालयाअंतर्गत होईल.
A weekly newspaper `**SAHYADRI CHA RAKHANDAR**` printed by ***Suraj Bhaktraj Ghume***, sahyandri multiservices, karmveer ward, warora 442907 (M.H) on behalf of **Ashish Maroti Ghume** owner, publisher & Editor of **sahyadri cha rakhandar** `matruchaya bhawan`, karmveer ward warora 442907(M.H). the editer may not be agree with the published content. in case any objection, the content will be redressed under warora court **RNI NO : MAHMAR/2018/77866**
**CONTACT NUMBER :- Ashish Ghume 9011708840, Suraj Ghume 9673560360 EMAIL :- sahyandrinews@gmail.com** **EPAPER :- epaper.sahyandrinews.com**